www.rajdand.com
सातारा शुक्रवार
९. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची



# बारामतीच्या मैदानात नणंद-भावजयीचा सामना?



भारतीय जनता पक्षाच्या श्रेष्ठींनी २०२४ च्यालोकसभानिवडणुकीत पक्षाच्या जागा आणि मतांची संख्या वाढविण्याचा निर्धार केला असल्याने मित्र पक्षांनी आपापल्या राज्यात त्यासाठी जोर लावावा, असे हा पक्ष त्यांना सांगत आहे. महाराष्ट्रातील भाजपचा महत्त्वाचा मित्रपक्षअजित पवारयांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसनेबारामती, सातारा, शिरूर आणि रायगड या चारही जागा खेचून घ्याव्यात, असा मनसुबा रचण्यात आला आहे. २०१९ च्यालोकसभानिवडणुकीत या जागा शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने जिंकलेल्या आहेत.शरद पवार यांनी पारंपरिकबारामतीलोकसभा मतदारसंघात कन्या सुप्रियाच आपली वारसदार असेल हे स्पष्ट केले आहे. परंतु,अजित पवारयांनी अचानक बंड करून पक्षातील बहुसंख्य आमदार हाताशी धरले आणि भाजप-(शिंदे) सेनेच्या सरकारमध्ये प्रवेश केला. त्यानंतर सगळे चित्र पालटले. ४० आमदार अजित पवार यांच्याबरोबर आहेत. भाजपच्या दिल्लीतील मुख्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार अजित पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून सुप्रिया सुळे यांच्याविरुद्ध आपल्या पत्नीला उभे करावे, असे त्यांना सुचविण्यात आले आहे. पंतप्रधान मोदी आणि शरद पवार यांच्यामध्ये गेल्या कित्येक दशकांची मैत्री असूनही हे डावपेच आखण्यात येत आहेत, कारण बदललेला काळ !राज्यसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व सहा जागा जिंकायचे, असे भाजपने ठरविल्याचे कळते. राष्ट्रीय लोकशाही आघाडी पाच जागा जिंकू शकते. परंतु, विरोधकांच्या छावणीत असलेले काही आमदार भाजपकडे वळवता आले तर सहावी जागाही जिंकता येईल, असे राजकीय पंडितांचे म्हणणे आहे. २८८ सदस्यांच्या सभागृहात काँग्रेसचे ४१ आमदार आहेत. आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचा गट किंवा उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा गट स्वबळावर एकही जागा जिंकू शकत नाही. थोरले पवार बारामतीत सहानुभूतीचा आधार घेऊ शकतात, अशी बातमी आहे. 'माझ्या आयुष्यातली ही शेवटची निवडणूक' असे ते सांगतील. अर्थात, त्याचा किती उपयोग होईल, हे येत्या मे महिन्यात कळेलच!विश्वासाआधीचा अविश्वास

हरयाणात साधारणतः ४५ वर्षांपूर्वी आयाराम-गयाराम यांनी धुमाकूळ घातला होता. त्यांचे सर्व विक्रम थोर 'पलटूराम' यांनी मोडून काढले आहेत. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांमध्ये समझोत्याचे प्रयत्न चालले असताना मध्यस्थांना एक अडचण दिसली. आपला मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा लगेच स्वीकारला जावा, भाजपने त्याच वेळी पाठिंब्याचे पत्र राज्यपालांना द्यावे आणि लगेचच राज्यपालांनी आपल्याला नेमणुकीचे पत्र द्यावे, अशी त्यांची मागणी होती. दिवस मावळायच्या आत शपथविधी समारंभ व्हावा, असा आग्रह देखील त्यांनी धरला होता.

इकडे भाजपची वेगळीच अडचण होती. नितीश कुमार यांना पाठिंबा देण्यासाठी विधिमंडळ पक्ष आमदारांची बैठक झालेली नव्हती. अशा स्थितीत राज्यपालांना पाठिंब्याचे पत्र कसे देणार, असा प्रश्न होता. पण, संशयाने घेरलेले नितीश कुमार अट मान्य झाल्याशिवाय समझोता मान्य करायला तयार नव्हते. शेवटी भाजपने त्यांच्या अटी मान्य करून टाकल्या आणि एक प्रस्ताव मांडला; तो म्हणजे लोकसभा निवडणुकीचे जागावाटप गुणवत्तेवर होईल;२०१९ च्या निकालाच्या आधारे होणार नाही.

पडद्यामागे ही अशी खेळी खेळली गेल्यानंतर शेवटी एकदाचे नितीश कुमार तयार झाले आणि भाजप सत्तेवर आला. गमतीची गोष्ट म्हणजे नितीश कुमारांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे बिहारमधील प्रमुख म्हणूनही नेमण्यात आले आहे. अडवाणींना भारतरत्न का?

मोदी सरकारने समाजवादी पक्षाचे नेते मुलायमसिंह यादव यांना २०२३ मध्ये पद्मविभूषण दिल्यापासून भाजपचे कट्टर कार्यकर्ते आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नाराज होता. मुलायम यांच्याच सरकारने अयोध्येत रामभक्तांवर गोळीबार केला होता, कारसेवक आणि पोलिसात त्यावेळी चकमक उडाली होती हे ते कसे विसरतील? या पार्श्वभूमीवर मुलायम यांना पद्मविभूषण दिल्यावर संघ परिवारात नाराजी होतीच. २००३ साली दत्तोपंत ठेंगडी यांनी पद्मभूषण नाकारले होते. संघाचे संस्थापक हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी यांना भारतरत्न दिले जात नाही तोवर आपण हा पुरस्कार स्वीकारणार नाही, अशी त्यांची भूमिका होती. पद्म पुरस्कारांविषयी संघ गेल्या कित्येक दशकांपासून मौन बाळगून आहे. म्हणूनच मोदी सरकारने अडवाणी यांना भारतरत्न जाहीर केल्यावर संघाच्या वर्तुळातून कोणतीही प्रतिक्रिया उमटली नाही. मात्र, सामान्य भाजप कार्यकर्ता बेहद खुश झाला. कारण फक्त दोन खासदारांपासून लोकसभेत पक्षाची ताकद १८२ पर्यंत नेण्याचे काम अडवाणींनी केलेले आहे, असे तो मानतो.मोदींना हव्यात ३७० जागा

भाजप आगामी लोकसभा निवडणुकीत ३७० जागा जिंकेल आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी ४०० जागांचा टप्पा पार करील, असे मोदींनी लोकसभेत जाहीर केले. आता हे उद्दिष्ट गाठण्यासाठी भाजप महाराष्ट्र, बिहार आणि इतरत्र असलेल्या मित्रपक्षांच्या शेपट्या पिरगाळत आहे. नितीश कुमार यांनी १७ ऐवजी १० ते १२ जागा लढवाव्यात, अशी पक्षाची अपेक्षा आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत नितीशकुमार यांना दिलेल्या पाच जागा भाजप परत मागतो आहे. २०१९ साली भाजपने महाराष्ट्रात शिवसेनेबरोबरच्या युतीत २५ जागा लढवल्या; आता अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शिवसेनेचा शिंदे गट यांनी ज्या जागा ते जिंकू शकतील तेवढ्याच लढवाव्यात, असे भाजप त्यांना सुचवित आहे. या नाजूक मुद्द्यावर अजून अंतिम निर्णय झालेला नाही.

## पृथ्वीराज चव्हाणांवर टीका करणाऱ्यांनी आपली उंची तपासावी : डॉ. सुरेश जाधव

सातारा : राज्याचे बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी काल कराड येथील एका कार्यक्रमात आमचे नेते माजी मुख्यामंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर टीका केली पण मंत्री महोदयांनी बाबांवर टीका करताना आपली तेवढी पातळी व उंची आहे का हे आधी तपासावे. अशी टीका सातारा जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव यांनी केली. डॉ. सुरेश जाधव पुढे म्हणाले कि, राज्यात विरोधी आमदारांना निधी देताना मंत्री महोदय किती दुजाभाव करतात हे सर्वांना माहित आहे. लोकप्रतिनिधींना जनतेने निवडून दिले असताना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना जर निधी मिळत असेल तर हा त्या भागातील जनतेचा एकप्रकारे अपमानच आहे. तसेच मंत्री महोदयांनी टीका करताना क्षमतेची केली पण त्यांना कदाचित माहित नसेल कि व्यासपीठावर त्यांच्या आजूबाजूला बसलेले सर्व आत्ताचे भाजप नेते यांची क्षमता आणि कुवत माननीय पृथ्वीराज बाबांच्यामुळेच निर्माण झाली आहे आणि त्याचमुळे आज ते भाजप मध्ये नेते म्हणून मिरवीत आहेत. पण त्यांचे ते नेतेपण होण्याची क्षमता पृथ्वीराज बाबांनी त्यांना मिळवून दिली आहे याची माहिती आधी मंत्री महोदयांनी घ्यावी. राहिला प्रश्न विकासाचा तर कराड जिल्हा होण्यासाठी जसा विकास अपेक्षित असतो असा सर्वांगीण विकास माननीय पृथ्वीराज बाबांनी कराडमध्ये केला आहे व त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी त्यांनी देऊन विकास केला आहे, त्यामुळे पृथ्वीराज बाबांची क्षमता काय आहे हे कराडची जनता जवळून अनुभवत आहे. उलट मंत्री महोदय ज्यांच्या प्रचारासाठी काल आले होते त्यांची पराभवाची हॅट्रिक कराडच्या जनतेने केली आहे कारण त्यांची क्षमता जनतेला माहित आहे.

## फलटणमध्ये अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची स्थापना

**मुंबई :** सातारा जिल्ह्यातील फलटण महसुली तालुक्यातील प्रकरणांसाठी ४ फेब्रुवारीपासून अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यात आले असून अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश हे त्याचे पिठासीन अधिकारी असल्याची माहिती विधी व न्याय विभागाच्या विधी सल्लागार व सहसचिव विलास गायकवाड यांनी अधिसूचनेद्वारे दिली आहे.

सातारा जिल्ह्यातील फलटण महसुली तालुक्यामध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रातील दिवाणी व फौजदारी प्रक्रिया संहितेनुसारची प्रकरणे या अतिरिक्त जिल्हा न्यायालयात चालविण्यात येतील. ४ फेब्रुवारी २०२४ पासून या न्यायालयाची निर्मिती करण्यात आली आहे. सातारा जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हे फलटण येथील सत्र उपविभागाचे सत्र न्यायाधीश असतील, असे या अधिसुचनेत नमूद करण्यात आले आहे.

## युवकाची धारदार चाकूने हत्या

### कुरुंदवाड नांदणी दरम्यानच्या रस्त्यावर सांगली गावभाग ३६ वर्षीय तरुणाचा निर्घृण खून



**कुरुंदवाड :** कुरुंदवाड नांदणी दरम्यानच्या रस्त्यावर गट क्रमांक १०१२/१ यांच्या शेतलगत अनोळखी शिफ्ट मोटार गाडीमध्ये ड्रायव्हर लगत असणाऱ्या सीटवर संतोष विष्णू कदम(वय.३६,रा.गाव-भाग सांगली) या युवकाची धारदार चाकूने हत्या करून अज्ञात मारेकऱ्यांनी वाहन सोडून पलायन केले आहे.

दरम्यान पोलिसांनी पंचनामा करत असताना वाहनांमध्ये दोन धारदार चाकू आणि गाडीच्या पाठीमागे दोन स्पोर्ट बूट आणि संतोष कदम याचा झटापटीमध्ये फुटलेला मोबाईल वाहनात मिळून आला आहे.


नांदणी कुरुंदवाड हा रस्ता हा रहदारीचा असल्याने तसेच शेतकरी आपल्या शेताकडे सकाळी जात असताना एका शेतकऱ्याने वाहनात डोकावून पाहिले असते.संतोष कदम याचा मृतदेह रक्तबंबाळ अवस्थेत दिसून आला. त्याने लगेच पोलिसांनी संपर्क साधून सदरची माहिती दिली.

घटनास्थळी तात्काळ सपोनी रविराज फडणीस पोलीस फाट्यासह दाखल झाले काही क्षणातच पोलीस उपाधीक्षक समीरसिंह साळवे,सांगली शहरचे पोलीस निरीक्षक विजय मोरे, गुन्हे अन्वेषण विभाग, फॉरेन्सिक तपासणी केंद्राचे आणि स्वामी पथक घटनास्थळी दाखल होऊन तपासाची चक्री गतिमान केली आहेत.

तथापि फॉरेन्सिक लॅबच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वाहनाची दरवाजे खुली करून मृतदेह सविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून वाहनातून दोन धारदार चाकू स्पोर्ट बूट जप्त करण्यात आले आहेत. मोबाईल फुटलेल्या अवस्थेत मिळून आला असल्याने सदरची हत्याही होत असताना झटापट झाल्याचे दिसते.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा अमृत महोत्सवी वर्धापन दिन सोहळा

### जीवनसाधना पुरस्कारांची घोषणा



**पुणे, :** 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणून नावलौकिक असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आपले अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. १० फेब्रुवारीला विद्यापीठाचा ७५ वा वर्धापन दिन आहे. यानिमित्त आयोजित सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून आध्यात्मिक गुरू आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकर उपस्थित राहणार आहेत. यांच्यासह मा.ना. श्री. अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री - महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. चंद्रकांत दादा पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकासमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचीही प्रमुख उपस्थिती असणार आहे. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.(डॉ) सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा.(डॉ) पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा.(डॉ) विजय खरे यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विद्या परिषदेचे सदस्य, अधिसभा सदस्य उपस्थित राहणार आहेत. १० तारखेला हा कार्यक्रम दोन भागात होणार असून २ ते ४ दरम्यान विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना, परिसंस्थांनां (महाविद्यालय) आणि 'युवा गौरव पुरस्कार्थींना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.(डॉ) सुरेश गोसावी यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरित करण्यात येणार आहेत. तर संध्याकाळी ४. ४५ वाजता आध्यात्मिक गुरू आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकर यांच्या हस्ते मान्यवरांना 'जीवनसाधना गौरव पुरस्काराने' सन्मानित करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम विद्यापीठाच्या खाशाबा जाधव इनडोअर हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे.

वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठातर्फे विविध पुरस्कार देण्यात येतात. त्यातील महत्वाचा पुरस्कार म्हणजे 'जीवनसाधना गौरव पुरस्कार'. यावर्षी आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नऊ जणांना हा पुरस्कार देण्यात येत आहे. राजकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी भारताच्या माजी राष्ट्रपती तसेच विद्यापीठाच्या माजी विद्यार्थिनी आदरणीय श्रीमती प्रतिभाताई देवीसिंह पाटील यांना 'जीवनसाधना गौरव पुरस्काराने' सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल श्री. राम नाईक,

कायदा क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी मा. पद्मश्री ॲड. उज्वल निकम, उद्योजकता व व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी मा. पद्मश्री मिलिंद कांबळे, शैक्षणिक व कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी कृषिरत्न मा. श्री. अनिल घमाजी मेहेर, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी मा. श्री. सतीशराव शिवाजीराव काकडे देशमुख, शैक्षणिक, सामाजिक व सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी मा. श्री. कृष्णकुमार गोयल, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी मा. प्राचार्य ठकाजी नारायण कानवडे आणि शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी मा. श्री. हेमंत हरिभाऊ धात्रक, यांना 'जीवनसाधना गौरव पुरस्काराने' सन्मानित करण्यात येणार आहे.

**वर्धापन दिनी देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांची यादी**

युवा गौरव पुरस्कार (२०२३ - २४)

१. कला - श्री. माने मकरंद मधुकर - चित्रपट दिग्दर्शक व निर्माता

२. क्रीडा - १) श्री. पुराणिक अभिमन्यू समीर - बुध्दिबळ

२) श्रीमती सोमण प्रणिता प्रफुल्ल - रोड सायकलिंग

३. साहित्य - श्री. जाधवर ज्ञानेश्वर प्रकाश - युवा साहित्य अकादमी पुरस्कार नामांकन व इतर

उत्कृष्ट महाविद्यालय / परिसंस्था पुरस्कार

१. व्यावसायिक अभ्यासक्रम (शहरी विभाग)- ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीचे, इन्स्टिट्युट ऑफ इन्फरमेशन टेक्नॉलॉजी, पुणे ४११००१.

२. व्यावसायिक अभ्यासक्रम (ग्रामीण विभाग)- संजीवनी रूरल एज्युकेशन सोसायटीचे, कॉलेज ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, ता. कोपरगाव, जि.अहमदनगर

३. अव्यावसायिक अभ्यासक्रम (शहरी विभाग) - पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, प्रा.रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्याल, आकुर्डी, पिंपरी चिंचवड, पुणे

४. अव्यावसायिक अभ्यासक्रम (ग्रामीण विभाग) - डांग सेवा मंडळाचे, दादासाहेब बिडकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय, पेठ, जि. नाशिक

उत्कृष्ट प्राचार्य / संचालक पुरस्कार

१. व्यावसायिक अभ्यासक्रम (शहरी विभाग) - डॉ. पाटील मनोहर जनार्दन, मराठवाडा मित्र मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, पिंपरी रोड, थेरगांव, पुणे

२. अव्यावसायिक अभ्यासक्रम (ग्रामीण विभाग) डॉ. रसाळ पुंडलिक विठ्ठल मराठा विद्या प्रसारक समाजाचे जीएमडी कला बीडब्ल्यू वाणि आणि विज्ञान महाविद्यालय, ता सिन्नर, जि. नाशिक

उत्कृष्ट अध्यापक पुरस्कार

१. व्यावसायिक अभ्यासक्रम (शहरी विभाग)- डॉ. मुंजे रविंद्र कचरू कर्मवीर काकासाहेब वाघ इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग, एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, पंचवटी, नाशिक

२. व्यावसायिक अभ्यासक्रम (ग्रामीण विभाग) - डॉ. सय्यद एतेशामुद्दीन शमशुद्दीन संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालय, सहजानंदनगर, पो. शिंगणापूर, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर

३. अव्यावसायिक अभ्यासक्रम (शहरी विभाग) - डॉ. गणपुले शिल्पागौरी प्रसाद , प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आकुर्डी प्राधिकरण, पिंपरी चिंचवड, पुणे

४. अव्यावसायिक अभ्यासक्रम विभाग (ग्रामीण विभाग)- डॉ. मगदुम सुजाता मार्तंड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दिंडोरी, ता. दिंडोरी जि. नाशिक

उत्कृष्ट नाविन्यपूर्ण शैक्षणिक कामगिरी पुरस्कार

१. व्यावसायिक अभ्यासक्रम (शहरी विभाग)- डॉ. आर अरोकिया प्रिया चार्ल्स डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग, मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च, रावेत, आकुर्डी, पुणे

२. व्यावसायिक अभ्यासक्रम (ग्रामीण विभाग)- डॉ. खियानी सिमरन राजीव जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, पुणे-नगर रोड, वापोली, पुणे

## मिरची कंडाप यंत्र नुकसानी बाबत जिल्हा परिषद सी. ई. ओ. यांनी दिला दिलासा

**सातारा :** ग्रामपंचायत नागठाणे तालुका सातारा येथील माजी सैनिक विधवा श्रीमती सुरेखा विलास चव्हाण यांचे उदरनिर्वाहाचे साधन असलेले मिरची कंडाप यंत्र दुकान अतिक्रमण ठरवून पाडण्यात आले. याबाबत त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार केली तसेच उपोषण केले. अखेर सातारा जिल्हा परिषदेच्या नूतन सी ओ श्रीमती शयानी नागराजन यांनी याबाबतचे निवेदन स्वीकारून त्यांना दिलासा दिला.

यावाबत राष्ट्रीय समाज पक्षाचे सातारा जिल्हा अध्यक्ष श्रीकांत देवकर व सीमेवर लढणाऱ्या सैनिकांच्या विकासाबाबत कार्यरत असणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या सौ. विद्या बर्गे यांनी आज सायंकाळी सातारा जिल्हा परिषदेच्या सी.ई.ओ श्रीमती नागराजन यांची भेट



**सातारा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नागराजन यांची भेट घेताना मान्यवर (छाया- मृणाल देवकुळे, सातारा)**

घेतली. त्यांना निवेदन देऊन झालेल्या घटनेबाबत माहिती दिली. याबाबत त्यांनी तातडीने चौकशी करून बेमुदत उपोषण करणाऱ्या श्रीमती सुरेखा विलास चव्हाण व त्यांच्या नातेवाईकांना तसेच राष्ट्रीय समाज पक्षाच्या कार्यकर्त्यांना दिलासा दिलेले आहे.

याबाबत महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने आठ फेब्रुवारी रोजी गट विकास अधिकारी बुद्दे यांची कार्य यांच्या कारभाराची चौकशी करून कारवाई करणे बाबत शशिकांत जाधव तहसीलदार

**नागठाणे आता तालुका सातारा येथील श्रीमती चव्हाण यांच्या यांच्यावर केलेल्या अन्याय विरोधात सातारा तालुक्यातील वडार समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करेल असा इशारा वडार पँथर संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश विटकर यांनी दिला आहे.**

महसूल जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांनी पत्र दिले होते तसेच आज राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने सर्व कागदपत्र व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया( अ) गट श्रीमती सुरेखा विलास चव्हाण यांचे व वडार समाजाच्या वतीने निवेदन, त्याचबरोबर सातारा जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाचे पत्र, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ग्रामपंचायत नागठाणे, भाडे पावती तसेच करारनामा, वीज मीटर बिल, नागठाणे ग्रामपंचायत कार्यालय नमुना नंबर ११ सन २०२३-२४ सालाबद्दल किरकोळ मागणीचे रजिस्टर, आधी कागदपत्र माहितीसाठी सादर केलेली आहे. तसेच झालेल्या नुकसानीचे छायांकित प्रतीही या निवेदनासोबत जोडण्यात आलेले आहेत.या निवेदनावर श्रीकांत देवकर यांची सही असून निवेदनाच्या प्रती वरिष्ठ पातळीवर देण्यात आलेले आहेत. सातारा जिल्हा परिषदेच्या सी. ई. ओ. यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर प्रथमच श्रीमती नागराजन यांच्याकडे लेखी निवेदन देण्यासाठी राष्ट्रीय समाज पक्षाचे कार्यकर्ते व उपोषणकर्ते यांचे नातेवाईक सोमनाथ धोत्रे, तानाजी देवकर, संतोष देवकर, रमेश विटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक आयोगाचा निषेध

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घड्याळ हे चिन्ह अजित पवारांचे आहे असे निवडणूक आयोगाने जाहीर केले. याचाच निषेध करण्यासाठी आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने निषेध आंदोलन केले .

तुषार कामठे म्हणाले की सरकारी यंत्रणेचा गैरवापर व गद्दारांना खतपाणी घालायचे काम भाजप करत आहे म्हणून मी भाजपचा जाहीर निषेध करतो. काही कार्यकर्त्यांनी मुंडन करून निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयाचा जाहीर निषेध केला.



यावेळी सरचिटणीस जयंत शिंदे सुलक्षणा धर, देवेंद्र तायडे,वरिष्ठ उपाध्यक्ष काशिनाथ जगताप, महिला अध्यक्षा ज्योती निंबाळकर, सामाजिक न्याय अध्यक्ष मयूर जाधव , अल्ताफ शेख, प्रशांत सपकाळ,अरुण थोपटे, विवेक विधाते,जयंत शिंदे,वंदना आराख, गणेश काळे, दिलीप पानसरे,राहुल धनवे, अण्णा पाखरे,विशाल जाधव, डीएम ढोले, प्राजक्ता जाधव, रंजना फ्रान्सिस, वैशाली मिडगुळे हेमंत बळकवडे,अनिल भोसले, योगेश सोनवणे,संजीवनी पुराणिक, विनोद धुमाळ, रूपाली भडाळे, विजयकुमार अंबड,जनाबाई जाधव, संजय पडवळ अशोक तनपुरे, समीर शेख, केडी वाघमारे, आशिष पांढरे, राजू खंडागळे, हनुमंत वाबळे,शोल कांबळे, राजकुमार माने, राजेश सोमानी, श्रीकांत पवार, राजरत्न शीलवंत, रिचर्ड पीटर,रेखा मोरे, सुधीर घोरपडे, नितीन मोरे,संदेश जगताप, अजित सूर्यवंशी, शोभा साठे आणि अविनाश कांबळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी काळ्या रंगाचे कपडे घालून आपला निषेध नोंदवला.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२१, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

## कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत विकासासाठी
# गुगल आणि महाराष्ट्र शासना दरम्यान सहकार्य करार
### एआय स्कीलिंग आणि स्टार्टअप्ससाठी विशेष कार्यक्रमांची सुरुवात करणार

**पुणे :** भारताला एक उत्तम भागीदार म्हणून आपली वचनबध्दता वाढवत, कृत्रिम बुद्धिमत्तेचे लाभ सर्वांना उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने गुगलतर्फे महाराष्ट्र सरकार बरोबर सहकार्य करुन नाविन्यपूर्ण आणि मोठ्या प्रमाणावर उपाय निर्माण करण्यात येणार असून यामध्ये कृषी, आरोग्य, शाश्वत विकास, शिक्षण आणि स्टार्टअप्स यांचा समावेश आहे.

एआयमधील संधीला महाराष्ट्रात गती प्राप्त करुन देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सरकार आणि गुगल दरम्यान सहकार्य करार (एमओयू) वर स्वाक्षरी करण्यात आली. करारावर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गुगल इंडियाचे कंट्री हेड आणि व्हाईस प्रेसिडेंट संजय गुप्ता आणि महाराष्ट्र सरकारचे मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांनी आज पुण्यातील गुगलच्या कार्यालयात स्वाक्षरी केली.



या सहकार्य कराराअंतर्गत महाराष्ट्र सरकारला गुगलच्या एआय नेतृत्वाच्या लाभासह तंत्रज्ञानातील कौशल्ये प्राप्त होऊन जमिनीच्या दस्तांचे व्यवस्थापन, आजार ओळखणे, ग्रामीण पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि एआय अपस्कीलिंग सह अन्य संधी उपलब्ध होणार आहेत. त्याच बरोबर महाराष्ट्र सरकारकडून आयआयआयटी नागपूर येथे अत्याधुनिक एआय सेंटर ऑफ एक्सेलन्स ची स्थापना करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात बोलतांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, महाराष्ट्र राज्य हे एआय वर आधारीत विकास करण्यासाठी वचनबध्द आहे आणि गुगल या प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा आहे. या सहकार्यामुळे नागरिकांना भविष्यासाठी सक्षम करुन कौशल्यांचा विकास होईल तसेच आरोग्य आणि कृषीसारख्या क्षेत्रात क्रांती घडून येईल. त्यामुळे महाराष्ट्रात एआयशी संबंधित क्रांती ही आयआयआयटी नागपूरच्या सेंटर ऑफ एक्सेलन्स च्या माध्यमातून एआय स्टार्टअप्सना चालना मिळू शकेल. आम्ही एआयला एक प्रगतीशील, सुयोग्य आणि शाश्वत भविष्याचे एक साधन म्हणून राज्यासाठी उपाय म्हणून पहात आहोत.

गुगल इंडियाचे कंट्री हेड आणि व्हीपी संजय गुप्ता यांनी सांगितले, या एआय फर्स्ट अंतर्गत महाराष्ट्र सरकारबरोबर भागीदारी करतांना आम्ही खूपच आनंदी असून आमच्या धाडसी आणि जबाबादार अशा दृष्टिकोनाममुळे एआयचा उपयोग करुन कौशल्य, आरोग्य, कृषी आणि शाश्वतता या क्षेत्रात प्रगती होऊ शकेल. या भागीदारीमुळे नागरिकांना सक्षम करुन त्यांना नवीन संधी मिळतील, नाविन्य पूर्ण इकोसिस्टम निर्माण होऊन एआयमुळे होणार्या बदलाची शक्ती महाराष्ट्रातील जनतेला प्राप्त होईल.

या सहकार्य कराराअंतर्गत गुगल महाराष्ट्र सरकार बरोबर खालील क्षेत्रासाठी सहकार्य करार करत आहे -

**एआय इन्नोव्हेशन आणि उद्योजकता :**

गुगलतर्फे राज्यात सक्षम एआय इकोसिस्टम तयार करुन स्टार्ट अप मार्गदर्शन, नेटवर्किंग आणि डेमो डेजचे आयोजन गुगल तज्ञांसह क्षेत्रातील दिग्गजांकडून करण्यात येणार असून यामध्ये तंत्रज्ञान, उत्पादन विकास, व्यवसाय धोरण आणि अन्य गोष्टींचा समावेश आहे. निवडक स्टार्टअप्सना त्यांचे कौशल्य दाखवण्यासाठी आणि गुंतवणूकदारांशी जोडण्याची संधी मिळणार आहे. गुगलकडून एआयवर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून त्यांचे डिझाईन हे स्थानिक आव्हानांना सोडवणे तसेच नाविन्य वाढीस लागून समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. गुगलच्या एआय स्टार्टअप प्रोग्राम च्या माध्यमातून पात्र व्हीसी फंडेड एआय स्टार्टअप्सना क्लाऊड क्रेडिट्स, टेक्निकल ट्रेनिंग आणि व्यवसायिक सहकार्य करुन त्यांच्या वाढीला गती दिली जाणार आहे.

**एआय स्किलिंग**

गुगलकडून सरकारच्या नेतृत्वाखालील कौशल्य प्रशिक्षण आणि शैक्षणिक उपक्रमांना सहकार्य करण्यात येणार असून याकरता सरकारी संस्थांकडून अधिक मागणी असलेल्या कौशल्य कोर्सेसना यूट्यूबवर सुरु करण्यात मदत करण्यात येणार आहे, तच बरोबर ट्रेन द ट्रेनर उपक्रमाअंतर्गत त्यांच्या जेन एआय उत्पादनांना शिक्षकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. ५०० हून अधिक सरकारी आयटी व्यावसायिकांना अत्याधुनिक अशा संभाषणात्मक एआय कुशलता या गुगल क्लाऊड वरुन शिकवण्यात येणार आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून कौशल्यातील दरी कमी करुन अधिक समृध्द असा शैक्षणिक अनुभव देऊन सरकारी सेवांमध्ये नाविन्य देता येऊ शकेल.



# शासकीय रेखाकला परीक्षांचा निकाल जाहीर

**राजगुरूनगर :** कला संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला परीक्षा एलिमेंटरी व इंटरमिजिएट या दोन्ही परीक्षांचा निकाल जाहीर झाला असून, येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागल्याची माहिती मुख्याध्यापिका जयश्री आसवले यांनी दिली.

एलिमेंटरी ग्रेड परीक्षेला ३० व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेला ३२ विद्यार्थी सहभागी झाले होते. यापैकी ७ विद्यार्थ्यांनी ' ए ' ग्रेड, ३५ विद्यार्थ्यांनी ' बी ' ग्रेड व २० विद्यार्थ्यांनी ' सी ' ग्रेड मिळविली. इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत अपेक्षा हिरामण रामाणे व अनिकेत विजय मांदळे या विद्यार्थ्यांना 'ए' ग्रेड, तर दैविक नंदकुमार सुतार, यश विकास कराळे, अथर्व सचिन लोखंडे, शंतनू पांडुरंग रणपिसे, समर्थ संतोष आर्विकर, समिक्षा पांडुरंग रणपिसे, कादंबरी गणेश लंगोटे, समृध्दी सचिन चौधरी, मानसी पांडुरंग पवळे, तनिष्का सुदाम शेवाळे, मयुरी बबन गार्डी, स्वप्नाली गणपत तांबे, अनुष्का धर्मराज भालेकर, आरती संदिप चौधरी, तनुजा जितेंद्र खेडकर, ऋतुजा कैलास वाघुले,श्रावणी संतोष मांदळे, श्रावणी गुरुदास रामाणे, वैभवी संतोष रामाणे या विद्यार्थ्यांनी 'बी' ग्रेड मिळवली.

सर्व विद्यार्थ्यांना कलाशिक्षक विजय कराळे यांनी मार्गदर्शन केले. दहावीच्या मुख्य परीक्षेत इंटरमिजिएट च्या श्रेणीनुसार विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण मिळतात तसेच भविष्यात अनेक वेगवेगळ्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेताना या प्रमाणपत्राचा उपयोग होत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# खटाव तहसीलच्या पुरवठा विभागाच्या ऑनलाईन शाखेला टाळा लावून कर्मचारी गायब

**वडूज :** खटाव तहसील कार्यालय नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत राहिले आहे. काल परवा झालेल्या लाच लुचपत विभागाच्या कारवाईने तर महसूलची अब्रू वेशीला टांगली असल्याचे चित्र स्पष्ट झाले असतानाच आता खटाव तहसील कार्यालयातील पुरवठा शाखेला कुलूप लावल्याचे दिसताच अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. याबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत काही नागरिकांनी मनसेचे राज्य चिटणीस सूरज लोहार यांच्याशी संपर्क साधला आहे .



याबाबत अधिक माहिती अशी की वडूज हे तालुक्याचे मुख्यालय असून याठिकाणी शासकीय, निमशासकीय, शाळा, महाविद्यालय असल्याने याठिकाणी येणाऱ्या नागरिकांची संख्या अधिक आहे. विशेषतः महसूल विभागात कामासाठी येणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांची मोठी ये जा असते. तर आज याठिकाणी असणाऱ्या पुरवठा शाखेच्या ऑनलाईन विभागला अक्षरशः कुलूप लावण्यात आले होते. तालुक्याचा विस्तार मोठा असल्याने ग्रामीण भागातून लांब पल्याहून येणाऱ्या जेष्ठ नागरिकांना याठिकाणी कामासाठी आल्यानंतर हताश होऊन माघारी जावे लागले.

आज याठिकाणी पुरवठा शाखेला कुलूप बघून अनेक नागरिकांना आपले काम न करताच मागे जावे लागल्याने अनेकांनी वडूजच्या तहसील कार्यालयातील पुरवठा शाखेच्या कामाकजाबद्दल नाराजी व्यक्त केली. तर याबाबत काही सुज्ञ नागरिकांनी येथील मनसेचे राज्य चिटणीस सूरज लोहार यांच्या कार्यालयात आपला मोर्चा वळविला. अन महसूल च्या या अनगोंदी कारभाराचा पाडा वाचला.

यानंतर सूरज लोहार यांनी स्वतः याठिकाणी जाऊन पाहणी केली असता तहसील कार्यालयत् असणाऱ्या पुरवठा शाखेला कुलूप असल्याचे दिसुन् आले. तर याठिकाणी कामानिमित्त आलेल्या नागरिकांनी याठिकाणी सर्वसामान्य जनतेची कामे होत नसल्याचे सांगितले. दिवसभर याठिकाणी थांबवून उद्या या परवा या अशी उत्तरे देत असल्याचे सांगितले.

यानंतर सूरज लोहार यांनी पत्रकारांना याबाबत माहिती देऊन लवकरच खटाव तहसील कार्यालयच्या कारभाराबाबत तीव्र आंदोलन छेडणार असल्याचे सांगून जिल्हाधिकारी यांना भेटून खटाव तहसीलचा कारभार सुधारण्यात यावा याबाबत चर्चा करणार असल्याचे सांगितले .

त्याचबरोबर संजय गांधी योजनेत कामानिमित्त येणाऱ्या जेष्ठ नागरिकांना अरेरावी केली जात असल्याचा आरोप ही त्यांनी यावेळी केला.

## जो नाही झाला काकांचा तो काय होणार लोकांचा?
# शिरोळमध्ये शरद पवार गटाची अजित पवार गटावर सडकून टीका

**शिरोळ :** महाराष्ट्राचा विकास नाही तर सिंचन घोटाळा लपविण्यासाठी अजित दादा भाजपात गेले. लहान मुलालाही माहित आहे राष्ट्रवादी कोणाची. अरे जो नाही झाला काकांचा तो काय होणार लोकांचा.. असे म्हणून शिरोळ येथे शरद पवार गटाची तालुकाध्यक्ष विक्रमसिंह जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली अजित पवार यांचा निषेध एका बैठकीत करण्यात आला.



शिरोळ येथे अजित पवार गटाचा निषेध करताना राष्ट्रवादीचे कार्यकर्ते.

बैठकिच्या अध्यक्षस्थानी शिरोळचे माजी सरपंच बि.जी.माने होते. ते बोलताना म्हणाले, आम्ही १९७८ पासून शरद पवार यांच्या सोबत आहे. पण आज घरातील लोक त्यांच्या पासून बाजुला गेले. आणि राष्ट्रवादीत फुट पाडली आहे. स्वता:च्या स्वार्थासाठी त्यांनी फार मोठ नुकसान केल आहे. पण आजही आम्ही त्यांच्या सोबत आहे. असे मनोगत त्यांनी केले. बोलताना तालुका अध्यक्ष विक्रमसिंह जगदाळे म्हणाले, शरद पवार ज्या ठिकाणी राहतील तो आमचा पक्ष. ते सांगतील ते आमचे धोरण, ते बांधतील ते आमचे तोरण, गाडीच्या कंपणीचा लोगो बदलला म्हणून ब्रँड बदलत नाही.

शरद पवार हाच आमचा ब्रँड आहे. येणाऱ्या काळात शरद पवारांच्या विचारांचा आमदार शिरोळ तालुक्यातुन निवडून आणल्याशिवाय आम्ही स्वाथ बसणार नाही असे मनोगत . यानंतर दिगंबर सकट, डि. पी.कदमसर, राजगोंडा पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी श्रेणीक कोगनोळे, शाहीर आवळे, मौला पटेल, विशाल जाधव, तात्यासो शिरहट्टी, आप्पासो बुधाळे, श्रीकांत कोळी, आनंदा कोळी, किरण कोळी, संजय सोलापुरे, समीर दानवाडे, गौस म्हैशाळे यांच्यासह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्राईम

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहरा नजीकच्या एका उपनगरातील अल्पवयीन मुलीशी तिच्या आईला उद्देशून अश्लील संभाषण केल्याप्रकरणी तिच्या पित्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करीत आहेत.

### विनयभंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** युवतीचा विनयभंग केल्याप्रकरणी एकाविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २४ रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास सातारा शहरा नजीक राहणारी एक युवती तिच्या भावासोबत घरी आली असता आकाश प्रकाश घाडगे रा. महाडिक कॉलनी, कारंडवाडी, सातारा याने तिच्या घरी येऊन तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल, असे वर्तन केले. याप्रकरणी त्याच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार गुरव करीत आहेत.

### ट्रकचालकावर गुन्हा

**सातारा :** अपघातात एकास जखमी केल्याप्रकरणी ट्रकचालकाविरुद सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ६ रोजी संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास नागेवाडी तालुका सातारा गावच्या हद्दीत असलेल्या महामार्गावर मल्लिकार्जुन गवडा मुरली रा. सुरशेट्टीकोप्पा, ता. कलघाटगी, जि. धारवाड यांनी त्याच्या ताब्यातील ट्रक क्र. एमएच ०३ ईजी २७९७ निष्काळजीपणे चालवून समीर अनंत गांगण रा. पावस, ता. जि. रत्नागिरी यांच्या पिकअप ला पाठीमागून धडक दिली. या धडकेत गांगण हे जखमी झाले असून त्यांच्या गाडीचे तसेच मालाचे नुकसान झाले आहे. अधिक तपास पोलीस नाईक मोरे करीत आहेत.

### माजी सैनिक वामन गायकवाड यांचे निधन

**कोरेगाव :** वाठार (किरोली) ता. कोरेगाव येथील माजी सैनिक वामन गणपती गायकवाड (काका) यांचे वय ८३ यांचे वृद्धापकाळाने



दुःखद निधन झाले. ते कोरेगाव तालुका शिक्षक संघाचे सरचिटणीस प्रविण गायकवाड, मुंबई पोलीस हवालदार संजय गायकवाड, तसेच शिवकृपा सहकारी बँकेचे वसुली अधिकारी राजेश गायकवाड यांचे वडील होते. त्यांचे पच्छात तीन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

## प्रतापगड कारखान्याकडून
# १३ कोटी ५२ लाख रुपये ऊस बिल बँकखाती वर्ग

**सातारा :** अजिंक्यतारा- प्रतापगड उद्योग समूहाच्या प्रतापगड सहकारी साखर कारखान्याकडून १६ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत गाळप झालेल्या उसाचे १३ कोटी ५२ लाख ४ हजार रुपये एवढे पेमेंट संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खाती वर्ग करण्यात आले आहे, अशी माहिती उद्योग समूहाचे मार्गदर्शक आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली.

प्रतापगड साखर कारखान्याचा गळीत हंगाम जोमाने सुरु असून दि. १६ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत ४५०६८.१३३ मे. टन उसाचे गाळप करण्यात आले. या गाळप झालेल्या उसाला प्रतिटन ३ हजार रुपये याप्रमाणे १३ कोटी ५२ लाख ४ हजार रुपये एवढी रक्कम संबंधित ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या बँक खाती दि. ६ फेब्रुवारी २०२४ रोजी वर्ग करण्यात आली आहे. संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या बँक शाखेत जाऊन खात्री करावी. दरम्यान, यापूर्वी ५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०२३ या कालावधीत ९६५२४.००५ मे.टन उसाचे गाळप झाले होते. त्याचे प्रतिटन ३ हजार रुपये याप्रमाणे २८ कोटी ९५ लाख ७२ हजार रुपये एवढे ऊस बिल यापूर्वीच संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खाती जमा करण्यात आले होते. या गळीत हंगामात दि. ५ नोव्हेंबर २०२३ ते ६ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत, ९४ दिवसांमध्ये २ लाख ३३ हजार ६३० मे.टन उसाचे गाळप करण्यात आले आहे. सरासरी साखर उतारा ११.३३ टक्के असून आज अखेर २ लाख ५९ हजार ९५० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे.

# सातारारोड आरोग्य केंद्रातील पाण्याची समस्या दूर होणार : सरपंच किशोर फाळके

**कोरेगाव :** प्राथमिक आरोग्य केंद्रात पाणी योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर पुरुषा प्रमाणात पाणी उपलब्ध होणार असून आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांची तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानातील पिण्याच्या पाण्याची गैरसोयी दूर होणार असल्याचे प्रतिपादन सरपंच किशोर फाळके यांनी केले.




ते आरोग्य केंद्रासाठीच्या पाणी योजनेच्या कामाच्या भूमिपूजन प्रसंगी बोलत होते. प्रकाशराव फाळके, कांताभाऊ फाळके, दिलीप फाळके, भानुदास फाळके, प्रताप चव्हाण, बापू फाळके, विजय राऊत, प्रवीण फाळके, ग्रामविकास अधिकारी विजय ढाणे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अश्विनी महालकर, अरीफ शेख, रवींद्र चव्हाण, निकेतन फाळके,आदी मान्यवर उपस्थित होते.

भाडळे खोऱ्यातील सातारा रोड, पाडळी स्टेशन हे मोठ्या लोकसंख्येचे गाव असून या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. सातारा रोड सह पंचक्रोशीतील गावे या आरोग्य केंद्रावर अवलंबून आहेत. मात्र अर्ज केंद्रामध्ये रुग्णासाठी तसेच वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानी पाण्याची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे अधिकारी कर्मचाऱ्यासह रुग्णांना देखील गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमी ग्रामपंचायतच्या माध्यमातून आरोग्य केंद्रासाठीच्या पाणी योजनेसाठी १ लाख ३७ हजार ४३७ एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यातून पिण्याच्या पाण्यासाठी बोरवल घेणे, त्यावर मोटार बसविणे आणि पाईपलाईन करून साठवण टाकीची व्यवस्था करणे अशी कामे केली जाणार आहेत.

### श्री दत्त इंडीयाने केले ६.५ लाख मे. टन ऊस गाळप

**फलटण :** श्री दत्त इंडीया प्रा. लि., साखरवाडी ता. फलटण या साखर कारखान्याने सन २०२३ - २४ च्या चालू वर्षीच्या गळीत हंगामात दि. ६ फेब्रुवारी अखेर ६ लाख ४३ हजार ६५१ मे. टन ऊस गाळप केले असून त्यापैकी दि. १५ जानेवारी अखेर गाळपास आलेल्या ऊसाला प्रतिटन ३१०० रुपये प्रमाणे १५५ कोटी ४७ लाख १५ हजार ५९३ रुपये ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केल्याची माहिती कारखान्याचे प्रशासन अधिकारी अजितराव जगताप यांनी दिली आहे.

यावेळी जनरल मॅनेजर फायनान्स अमोल शिंदे, केन मॅनेजर सदानंद पाटील, शेतकी अधिकारी भागनवर, युनियन जनरल सेक्रेटरी राजेंद्र भोसले उपस्थित होते.




# चंदुकाका सराफ ज्वेल्स यांचे नवीन 'लव अनकट' कॅम्पेन!

**सातारा :** अखंड हिरे हे नात्यांसारखे खरे असतात... नातं जे अतूट असतं.नाती ज्यांच्यात कसलीही अट नसते...नातं, जे शब्दावाचून व्यक्त होतात... म्हणून प्रेम हे अखंड असावं... ज्याप्रमाणे अखंड हिरे मौल्यवान असतात त्याचप्रमाणे नाती देखील अत्यंत मौल्यवान असतात. नाती ही अतूट असतात. म्हणून या नात्यांची वीण असलेले प्रेम हे अखंड असावे.. याच अखंडतेच्या परंपरेला अधिक समृद्ध करण्यासाठी चंदुकाका सराफ ज्वेल्स घेऊन आले आहेत एक नवीन कॅम्पेन 'लव अनकट'..

ह्या कॅम्पेनच्या माध्यमातून ग्राहकांसाठी नवीन प्रकाराचे स्टॅकेबल रिंग्ज, डूअल रिंग्ज सादर केले आहेत. या व्यतिरिक्त तनमनिया, डोरलं या प्रकाराचे हिऱ्यांचे मंगळसूत्राचे नवनवीन उपलब्ध आहेत.

'लव अनकट' कॅम्पेनच्या माध्यमातून आपल्या प्रेमाला दागिन्यांच्या माध्यमातून अधिक बळकटी देण्यासाठी चंदुकाका सराफ ज्वेल्स यांनी सदर श्रेणी साकारली आहे. यानिमित्ताने ग्राहकांना हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १००% पर्यंत सूट मिळणार आहे. १५ मार्च पर्यंत ग्राहकांना सदर ऑफरचा लाभ घेता येईल. 'लव अनकट' श्रेणी चंदुकाका सराफ ज्वेल्सच्या महाराष्ट्र व कर्नाटक येथील दालनांमध्ये उपलब्ध आहे.

याच अतूट नात्याला अधिक समृध्द करण्यासाठी लवकरच वाकड, पुणे येथे फिनिक्स मॉल ऑफ मिलेनियममध्ये चंदुकाका सराफ ज्वेल्सच्या नव्या शाखेची सुरुवात होत आहे. सोन्याच्या व हिऱ्यांच्या दागिन्यांची नवीन व्हरायटी इथे पाहायला मिळणार आहे. यातूनच गेल्या १९७ वर्षांची अतूट नात्याची आणि विश्वासाची परंपरा कायम जपली जाणार आहे.

तर आजच आपला हिऱ्याचा दागिना बुक करा आणि आपल्या अतूट नात्याला हिऱ्यांप्रमाणे मौल्यवान करा असे आवाहन चंदुकाका सराफ ज्वेल्स्चे संचालक श्री. सिध्दार्थ शहा यांनी केले आहे.

# माण तालुक्याचा दुष्काळी वनवास संपला...!

## १९ रोजी मोदींच्या हस्ते जिहे-कठापूर योजनेचे लोकार्पण

## माण खटावमध्ये गुढी उभारून आनंदोत्सव साजरा केला जाणार

**दहिवडी :** गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन (जिहे कठापूर) योजनेचे पाणी आंधळी धरणात दाखल झाल्यामुळे गेल्या कित्येक दशकांपासून दुष्काळाने होरपळत असणाऱ्या माण तालुक्याचा दुष्काळी वनवास संपला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १९ फेब्रुवारी रोजी आंधळी धरणातील पाणीपुजन करून या योजनेतील पाण्याचे माणवासियांसाठी लोकार्पण करून हा सुवर्णसोहळा पार पडणार आहे..

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माणमध्ये होणाऱ्या दौऱ्या निमित्त त्यांच्या स्वागताची ऐतिहासिक तयारी आमदार जयकुमार गोरे यांनी सुरू केली असून सात हेलिपॅडस बनवण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. धरण परिसरातील झुडपे काढण्यात येत आहेत. आंधळी धरणाची व परिसराची मोठी स्वच्छता सुरू आहे. कार्यक्रमाच्या प्रोटोकॉलनुसार सूक्ष्म नियोजन सुरू असल्याची माहिती आ. जयकुमार गोरे यांनी दिली.

गुरुवर्य कै. लक्ष्मणराव इनामदार उपसा सिंचन (जिहे कठापूर) योजनेला गती यावी, म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रातून या योजनेला निधी दिला.



महाराष्ट्र सरकारनेही निधी उपलब्ध करून दिला. आ. जयकुमार गोरे यांच्या प्रयत्नांना मोठे यश प्राप्त झाले आहे. त्यामुळेच दुष्काळी माण व खटाव तालुक्यातील जनतेला मोठा आधार मिळाला आहे. या पाणी योजेनेचे पाणी आंधळी धरणात आले आहे. धरण भरल्यावर नदीवरील ३० पेक्षा जास्त बंधाऱ्यात पाणी साठा केला जाणार आहे. त्याच बरोबर या योजनेत सव्वा टीएमसी वाढीव पाणी मिळाले.

असून त्यासाठी ३७० कोटी रुपयांचा निधीही मिळाला आहे. या सुधारित कामांना तालुक्यात गती प्राप्त झाली असून माणच्या उत्तर भागातील ३० पेक्षा जास्त गावांना पाणी मिळणार आहे.कायमस्वरूपी पाणी

उपलब्ध होणार असल्याने हजारो शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवणार आहे. आंधळी धरणात पाणी सोडल्याने पाणीसाठा वाढत चालला आहे. पाणी पूजन झाल्यानंतर धरणाच्या शेजारीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा होणार आहे. बुधवारी या परिसराची पाहणी आ. जयकुमार गोरे, मुख्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक सचिन जोशी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा पोलिस प्रमुख समीर शेख यांनी केली. या पाहणीप्रसंगी भाजपचे तालुका अध्यक्ष गणेश सत्रे, सिद्धनाथ पतसंस्थेचे संचालक अरुण गोरे, अर्जुन काळे, पांगरीचे सरपंच अजित दडस, प्रशासनाचे विविध अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.



**आंधळी धरण परिसराची पाहणी करताना आ. जयकुमार गोरे मुख्यमंत्री स्वीय सहाय्यक सचिन जोशी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा पोलीस प्रमुख समीर शेख व इतर.**

### आटलेल्या विहिरींच्या पाणीपातळीत वाढ.!

**चालू वर्षी माण तालुक्यात नेहमीपेक्षा मान्सून खूपच कमी झाल्यामुळे तालुक्यातील बहुतांश विहीरिंचे पाणी आटले आहे .विहीरींनी तळ गाठल्यामुळे शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. मात्र सध्या जिहे-कठापूर योजनेचे पाणी ज्या परिसरातून प्रवाहीत होत आहे त्यालगत असणाऱ्या विहिरीच्या पाणीपातळीत हळू हळू वाढ होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.**

### माण तालुक्यात गुढी उभारून आनंदोत्सव

**माण तालुक्याला कधीच पाणी येऊ शकत नाही असे व्यक्तव्य राजकारणातील काही जेष्ठ नेत्यांनी केले असताना. आज त्याच माण तालुक्यात ऐन दुष्काळात जिहे कठापूर योजनेचे पाणी खळाळत असून आंधळी तलावातील पाणी पातळी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. लवकर आंधळी तलाव पूर्ण भरून हे पाणी माणगंगेतून म्हसवडच्या दिशेने कूच करेल.त्यामुळे या अभूतपूर्व सुवर्णसोहळ्याचे संपूर्ण माण तालुक्यात गुढी उभारून आनंदोत्सव साजरा केला जाणार आहे.**

---


# डॉ. कल्याणी पवार यांना श्री शंभू गौरव पुरस्काराने सन्मानित

### निराधार आज्जी आजोबांना दिला आधार

**राजगुरूनगर :** पूर (ता.खेड ) परिसरात वृद्धाश्रमच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल डॉ. कल्याणी पवार यांना श्री शंभू गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

गेली तेरा वर्ष निराधार आज्जी आजोबांना आधार देण्याचे काम डॉ. कल्याणी पवार करत आहेत.

खेड तालुक्याच्या पूर्व भागातील पूर ( ता.खेड ) तेथे गेल्या अनेक वर्षांपासून द्वारका वृद्धाश्रम सुरू असून कल्याणी पवार सामाजिक बांधिलकी ठेऊन वृद्धांची सेवा करीत आहेत. त्यांच्या वतीने इतर अनेक सामाजिक व वैदकिय मदत या परिसरातील गरजूंना केली जाते.



त्यांच्या या कामाची दखल घेत श्री शंभुराज्याभिषेक ट्रस्ट, कर्तव्य सोशल फाउंडेशन व छत्रपती शिवाजी ब्रिगेड यांच्या वतीने लाल महाल पुणे येथे पुरस्कार वितरण सोहळ्यात आयोजन करण्यात आले होते.

यावेळी केंद्रीय दूरसंचार व तंत्रज्ञान समितीचे सदस्य डॉक्टर आदित्य पतकराव ,छत्रपती शिवाजी ब्रिगेडचे अध्यक्ष अशोक शिंदे , राजेंद्र कुंजीर, शेखर पाटील ,गणेश मस्के व इतर मान्यवर उपस्थित होते. बाबा आमटे कुटुंबीयांचा आदर्श समोर ठेऊन निस्वार्थ भावनेनं संपूर्ण कुटुंब सेवा देत असल्याचे डॉ. कल्याणी पवार यांनी सांगितले.

# आळंदी येथे १२ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रपित्याचे पुण्यस्मरण' कार्यक्रम

### महाराष्ट्र गांधी स्मारक निधीतर्फे आयोजन

**पुणे:** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि नगर परिषद आळंदी यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रपित्याचे पुण्यस्मरण' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आळंदी येथे घाटावरील रक्षा विसर्जन स्तंभ येथे सोमवार,१२ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेआठ वाजता हा कार्यक्रम होईल.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर महात्माजींच्या इच्छेनुसार त्यांच्या अस्थी रक्षेचे भारतातील प्रमुख नद्यांप्रमाणे इंद्रायणीमध्येही विसर्जन झाले. एका कलशातील अस्थी रक्षेचे विसर्जन आळंदी येथील इंद्रायणी नदीमधे दि. १२ फेब्रुवारी १९४८ रोजी करण्यात आले. त्यांची स्मृती म्हणून रक्षा विसर्जन स्तंभ उभारण्यात आला. दरवर्षी १२ फेब्रुवारी रोजी आळंदी येथे गांधीजींना अभिवादन करण्यात येते. ७६ वर्ष ही परंपरा सुरु आहे.

यावर्षीसुद्धा हा अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. इंद्रायणी नदीच्या घाटावर सकाळी ठीक साडेआठ वाजता हा कार्यक्रम होईल. ह.भ.प.ज्ञानेश्वर बंडगर, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी, सचिव संदीप बर्वे, विश्वस्त अन्वर राजन, देवराम ढुंडरे-पाटील, आळंदी नगर पालिकेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे, गणपतराव कुऱ्हाडे, तुषार झरेकर आदी उपस्थित राहणार आहेत.

# माता रमाई भीमराव आंबेडकर जयंती उत्सवात साजरी

**कोरेगाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर , व भारतीय बौद्ध महासभा यांच्या सौजन्याने शाखा कोरेगाव यांच्या वतीने माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंती निमित्त २९ जानेवारी ते ७ फेब्रुवारी पर्यंत महिला उपासिका शिबिर व महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी सातारा जिल्हा व कोरेगाव तालुका सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, व सर्व प्रथम पंचशील ध्वजाचे रोहन करण्यात आले, त्यांनतर तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच माता रमाई च्या प्रतिमेस अभिवादन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले व सातारा व कोरेगाव तालुका मधील जनते साठी माता



रमाई जयंती निमित्त धम्म भोजन दान चे नियोजन करण्यात आले व तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे बौद्ध धम्म या विषयी महिला प्रशिक्षणाचे आयोजित करण्यात आले होते या वेळी महिला शिबिराचे उद्घाटन प्रतिभाताई अहिरे (केंद्रीय शिक्षिका) व महिला जिल्हा सचिव शर्मिला आवडे मॅडम यांनी केले, तसेच मोठ्या उत्साहाने जयंती साजरी करण्याचे नियोजन यात मोलाचा वाटा कोरेगाव कोषाध्यक्ष निलेश सपकाळ, कोरेगाव संघटक विकास येवले, तसेच नितीन बोतलजी आर पी आय कोरेगाव तालुका अध्यक्ष व महिला संघटक सारिका आडेकरी, अक्षदा सरगडे, सपना सरगडे, प्रतिभा येवले, शोभा येवले ( माझी नगरसेवक) यांच्या उपस्थिती मध्ये कार्यक्रम अतिशय चांगल्यारित्या संपन्न झाला.

---

# नायगावमध्ये मतदान जनजागृती होणे अत्यंत गरजेचे

### - श्रीकांत देशपांडे निवडणुक आयुक्त (महाराष्ट्र)

**कोरेगाव :** शेवराई सेवाभावी संस्थाच्या वतीने नामदेव भोसले यांच्या संकल्पनेतून आयोजित कार्यक्रम कै.ज्ञानदेव भोसले आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमानित्ताने पुणे जिल्ह्यातील तिन लाख पारधी व भिल समाजाला मतदान जनजागृतीवर हर घर ओटींग कार्ड घर पोच उपक्रम राबविण्यात आला. या वेळी निवडणूक आयुक्त श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते आदर्श माता शेवराबाई भोसले यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे निवडणूक आयुक्त श्रीकांत देशपांडे,जेष्ठ आदिवासी समाज सेवक व साहित्यिक. नामदेव भोसले, हवेलीचे उपविभागीय दंडाधिकारी संजय आसवले,शिरुरच्या प्रांत श्रीमती देवकाते , बारामती प्रांत वैभव नारवडकर,आदर्श माता शेवराबाई भोसले, हवेलीचे तहसिलदार किरण सुरवसे, शिरुरचे तहसिलदार. म्हेत्रे, इंदापूरचे तहसिलदार. श्रीकांत पाटील,तसेच जिल्हातील नायब तहसिलदार, मंडलाधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, जेष्ट लेखक भास्कर भोसले पत्रकार, सरपंच राजेंद्र चौधरी, नायगावचे ग्रामस्थ,ऊरुळी कांचनचे सरपंच भाऊसाहेब कांचन, व ऊरुळी कांचन ग्रामस्थ, तुकाराम भोसले, राजेंद्र टिळेकर , बाळासो चौरे, राजेंद्र टिळेकर,व टिळेकरवाडी, भवरापुर,तळेगाव ढमडरे ग्रामस्थ,इंदापुर तालुक्यातील तक्रारवाडी सरपंच व ग्रामस्थ कार्यक्रमास उपस्थित होते.



यावेळी हवेली तालुक्यातील नायगाव व ऊरुळी कांचन भोसले वस्ती, टिळेकर वाडी खामगाव टेक, शिरुर तालुक्यातील तळेगाव ढमडरे येथे आणि इंदापुर तालुक्यातील तक्रार वाडी येथे निवडणुक आयुक्त श्रीकांत देशपांडे व आदिवासी समाजसेवक यांच्या हस्ते आदिवासी फासे पारधी व भिल समाजला ओटींग कार्ड,रेशनिंग कार्ड,जातीचा दाखले,जागा पट्टे सातबारा , उत्पन्नाचा दाखले वाटप करण्यात आले, तसेचं एकुन पारधी समाज व भिल समाजाला सात हजार नविन ओटींग कार्ड,तीन हजार जातिचे दाखले, चौदाशे रेशनिंग कार्ड उत्पन्नाचे दाखले व हर घर हर एक व्यक्ती ओटींग कार्ड घर पोच उपक्रम राबविण्यात आला.

महाराष्ट्र राज्याचे निवडणूक आयुक्त श्रीकांत देशपांडे हे आदर्श माता शेवराबाई भोसले व त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये सहभागी झाले होते , त्या दौऱ्यानिमित्त चे औचित्य साधून या वेळी हवेली तालुक्यातील नायगाव, ऊरुळी कांचन, शिरुर, इंदापुर येथे कार्यक्रमा मध्ये श्रीकांत देशपांडे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन केले,

महाराष्ट्र स्वातंत्र्यानंतर राज्यात पहिल्यादांच पारधी वस्तीस गाव भेट देऊन या समाज्याचे दु:ख जाणुन घेणारे श्रीकांत देशपांडे पहिलेच अधिकारी आहेत, पारधी समाजाच्या समस्या व उपाय तसेच प्रत्येक मतदानाचे महत्त्व काय आहे हे पारधी समाजास पटवून दिले व त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना काही सूचना दिल्या तसेच ज्या पारधी बांधवांना कंलकीत नजरेन पाहिले जात होते, अशा कुटुंबासाठी विशेष लक्ष देवून पारधी समाजातील जेष्ठ समाजसेवक नामदेव भोसले यांनी पारधी समाजातील तरुणांना मासेमारी व्यवसायामध्ये आणले व बोटिंग व्यवसाय, शेळी पालण, शेतीमध्ये रोजंदारी, असे व्यसाय मध्ये आणले त्या मध्ये आपली उपजीविका कशी भागवतात याची प्रत्यक्ष पाहणी केली व त्यांना मार्गदर्शन केले.

# स्वत:च्या स्वार्थासाठी सरड्याप्रमाणे रंग बदलणाऱ्यांना ओळखा : सुरेंद्र गुदगे

### पाचवड येथे दहा लाख रुपयांच्या कामाचा शुभारंभ

**मायणी :** कै.माजी आमदार भाऊसाहेब गुदगे संघटनेशी पाचवड ग्रामस्थांचे जुने ऋणानुबंध आहेत त्यामुळेच त्यांच्या काळापासून ते आजअखेर त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून मी पाचवड- कठरेवाडी येथे कोट्यावधीची विकास कामे मार्गी लावली आहेत. मात्र विकासाचे राजकारण न करणाऱ्या नेतेमंडळींनी केवळ स्वतःच्या स्वार्थापोटी राजकारण केले कधीकाळी गुदगे संघटनेला विरोध करणारे ते त्यांच्या गुणांनी संपले आहेत.त्यामुळे ते दुसऱ्याच्या मांडीवर जाऊन बसले. आता निवडणुका लागत असल्याने स्वतःच्या स्वार्थासाठी ते तुमच्याकडे येतील मतांचा जोगवा मागतील त्यामुळे केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी सरड्याप्रमाणे रंग बदलणाऱ्या अशा नेत्यांना ओळखून त्यांना दारातही उभा करू नका असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेंद्र गुदगे यांनी केले. ते पाचवड येथे दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत दहा लाख रुपये मंजूर केलेल्या रस्त्याच्या भूमिपूजनाप्रसंगी बोलत होते.



यावेळी ग्रामपंचायत सदस्य नाथा खैरमोडे ,आप्पासो मोहिते, चंद्रहार ,घाडगे गोटया पाटील, नवनाथ घाडगे, लव्हराज सकट ,बापूराव घाडगे ,काकासो घाडगे, महादेव अवघडे ,रघुनाथ जाधव ,मोहन जाधव ,सुनील जाधव, सुनिल घाडगे ,विराज घाडगे उपस्थित होते.

गुदगे पुढे म्हणाले की प्रत्येक गावात विकास कामे करताना लोकांचा नारळावरचा जो विश्वास उडाला तो मी पुन्हा बसवला असून मंजूर केलेल्या कामाची माहिती प्रथम लोकांपर्यंत पोहोचवून मगच त्या कामाचा नारळ फोडून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होते.कोणतीही निवडणूक नसताना कोट्यावधींची कामे लोकांपर्यंत पोहोचवली.विकास कामात कधीही राजकारण आणले नाही. आता निवडणुका लागल्याने पावसाळ्यात जशा छत्र्या बाहेर निघतात तसे नेते मंडळी बाहेर निघायला लागली आहेत.त्यामुळे लोकांनी तुटपुंजा आमिषाला बळी पडू नये त्याने गावाचा विकास खुंटतो आहे. त्यामुळे विकास कामे करणाऱ्यांना पाचवड करांनी ताकद द्यावी. आपल्याच भागातील नेतृत्व मोठे करण्यासाठी सर्वांनी नेटकी भूमिका घेतली पाहिजे. विकास कामांची कसलीही काळजी करू नका हवे असतील तेवढी कामे मी मंजूर करून देईन त्यासाठी सर्वांनी विकास कामे करणाऱ्यांची पाठराखण करायला हवी. यावेळी लव्हराज सकट, मोहन खैरमोडे,महादेव अवघडे, बापूराव घाडगे,काकासो घाडगे यांनी आपली मनोगत व्यक्त केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळकृष्ण गुरव यांनी केले. आभार संजय अवघडे यांनी मानले.

# मोदी सरकार' ऐवजी 'भारत सरकार' नावाने योजनांचा प्रचार करा

वडूज : भारत सरकारच्या योजनांचा प्रचार आणि प्रसार करताना मोदी सरकार हा बेकाईदेशीर शब्द वापरण्या विरोधात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल दादा राऊत यानां नागपूर येथे आंदोलन केल्यानंतर त्यांना अटक करून पोलीस चौकशीसाठी ठेवले आहे.त्यांची सुटका करावी व केंद्र सरकारच्या जाहिराती वर मोदी सरकार ऐवजी भारत सरकार प्रसिध्द करण्याबाबतचे निवेदन सातारा जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने,खटाव तहसीलदार व माण तहसीलदार यांना देण्यात आले.!

यावेळी जिल्हाध्यक्ष अमरजित कांबळे, जिल्हा सरचिटणीस अमित चव्हाण, विधानसभा अध्यक्ष संदीप सजगने, माण तालूका ओबीसी अध्यक्ष सुनील शेळके, खटाव तालुका अध्यक्ष आणसाहेब काकडे,राम कुलकर्णी सह पदाधिकारी उपस्थित होते.

# एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून गावोगावी होणार अनुसूचित जातीच्या योजनांची जनजागृती



**सातारा :** राज्य शासनामार्फत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना त्यांच्यासाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती व्हावी यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, सातारा यांच्यावतीने एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या वस्तींमध्ये जावून जनजागृती करणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे मोबाईल एलईडी व्हॅनची फित जिल्हा जाती पडताळणी समितीच्या उपायुक्त स्वाती इथापे यांनी फित कापून व समाज कल्याणचे सहायक आयुक्त नितीन उबाळे यांनी हिरवा झेंडा दाखवून व्हॅन मार्गस्त केले. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे यांच्यासह समाज कल्याण विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

एकूण १०० गावांमध्ये एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून २९ फेब्रुवारीपर्यंत जनजागृती करण्यात येणार आहे.

# महाराष्ट्रात ४५ खासदार निवडून आणण्यासाठी घटक पक्षांची जोरदार मोर्चे बांधणी

## केंद्रीय कार्यकारिणीच्या निर्देशानुसार काम करणार, सार्वजनिक बांधकाममध्ये रवींद्र चव्हाण यांची माहिती

**सातारा :** आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील ४८ मतदारसंघांमध्ये ४५ पेक्षा जास्त खासदार निवडून आणण्याच्या दृष्टीने केंद्रीय कार्यकारणीच्या बैठका होत आहेत महाराष्ट्रामध्ये त्या दृष्टीन माहितीचा घटक पक्षांची काम सुरू आहे त्यामुळे यंदाची लोकसभा ही भाजपचे राजकीयबळ सिद्ध करेल असा ठाम विश्वास राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला

येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचा आढावा, मेडिकल कॉलेजला भेट, तसेच काही प्रकल्पांची पाहणी अशा विविध मुद्द्यांच्या निमित्ताने मंत्री चव्हाण सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते . त्यावेळी येथील शासकीय विश्रामगृहामध्ये त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला . यावेळी आमदार शिवेंद्रसिंहराजे व आमदार महेश शिंदे उपस्थित होते. चव्हाण पुढे म्हणाले, राज्यांमध्ये महायुतीचे घटक पक्ष ४५ पेक्षा अधिक खासदार निवडून आणण्याच्या दृष्टिकोनातून सक्रिय आहेत .केंद्रीय कार्यकारिणीने निवडून दिलेला निवडणूक कार्यक्रम हा महाराष्ट्रात केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत राबवल्या जात आहे. राज्यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे आगामी लोकसभा निवडणुकांच्या दृष्टिकोनातून कटिबद्ध असून त्यांनी महाराष्ट्रात ४५ पेक्षा अधिक खासदार निवडून आणण्याच्या दृष्टिकोनातून कामाची विभागणी केली आहे .उमेदवारांच्या संदर्भामध्ये परिस्थिती सापेक्ष लवकरच निर्णय घेतला जाणार आहे त्यामुळे महाराष्ट्रामध्ये भाजपचे राजकीय बळ काय आहे याचे उत्तर आगामी लोकसभा निवडणुका दरम्यान कळून येईल असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सातारा जिल्ह्यातील पर्यटन स्थळांना संदर्भात निधी कमी पडत असल्याच्या प्रश्नावर ते म्हणाले महाराष्ट्रात विशेषता मुख्यमंत्र्यांचा जिल्हा म्हणून सातारा जिल्ह्यामध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती यामध्ये रस्त्यांची निर्मिती उड्डाणपुलाची निर्मिती यासाठी जास्तीत जास्त निधी दिला जात आहे व पर्यटन वाढीच्या दृष्टिकोनातून जिल्ह्याच्या पश्चिमेकडील दुर्गम भागांमध्ये नद्यांवरील उड्डाणपूल हे पर्यटन विकास महामंडळाच्या सहकार्यातून बांधले जाणार आहेत असे किमान ४५ पूल पश्चिम महाराष्ट्रामध्ये बांधून पर्यटनाला उत्तेजन देण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाचा मानस आहे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः पर्यटन वृद्धीसाठी आग्रही असून त्यांनी नवीन महाबळेश्वर प्रकल्पासह येथील वॉटर स्पोर्ट्स तसेच वेगवेगळ्या पर्यटन वृद्धीच्या योजनांना प्रचंड निधी दिला आहे जेथे निधी कमी पडत आहे त्या संदर्भातील प्रस्ताव हे वित्त विभागाला सादर केले जाणार आहेत .आमदार शिवेंद्रसिंहराजे यांनी पाण्याखाली जाणाऱ्या पुला संदर्भात सूचना केली आहे, त्या प्रस्तावांचा निश्चित विचार केला जाईल असे ते म्हणाले .

सातारा जिल्ह्यातील पायाभूत सुविधा तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे साकारले जात असलेले प्रकल्प यांची मी पाहणी केली तसेच संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केल्याची चव्हाण यांनी सांगितले जे ठेकेदार काळे यादी टाकले जातात त्यामुळे प्रत्यक्ष कामाची अडचण होते त्या कामाची अडचण न होता त्या ठेकेदाराला समज देणे आणि त्याच्याकडून दर्जेदार काम करून घेणे ही चौकट ठरवणे गरजेचे आहे यासंदर्भात अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

यावेळी सार्वजनिक बांधकाम प्रकल्पाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या तपासणी शिबिरांमध्ये सुमारे १४० कर्मचारी व अधिकाऱ्यांनी भाग घेतला होता या आरोग्य शिबिराचे उद्घाटन रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले येथील शासकीय विश्रामगृहांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागासाठी काम करणाऱ्या ठेकेदारांच्या शिष्टमंडळाने चव्हाण यांना यावेळी निवेदन सादर केले या निवेदनांमध्ये शासकीय देयके वेळेवर मिळत नसल्याने ठेकेदारांची अडचण होते त्यामुळे देयके निघताना त्याच्यामध्ये सुलभता आणि पारदर्शकता आणण्यात यावी अशी मागणी यावेळी ठेकेदारांच्या शिष्टमंडळाने केली.





# नेत्रदीपक महानाट्याच्या माध्यमातून पुणेकरांसमोर उलगडला श्री बालाजीचा इतिहास

**पुणे :** श्री बालाजी यांचे भूलोकी आगमन, त्याच्या लीला, त्यांचा इतिहास, कोल्हापुरातील श्री महालक्ष्मी यांच्याशी श्री बालाजी यांचे नाते... अशा अनेक गोष्टींवर प्रकाश टाकत आज 'श्री बालाजी महानाट्या'च्या रूपाने पुणेकरांसमोर श्री बालाजी यांचा इतिहास उलगडला. नेत्रदीपक अशा पाच मजली भव्य रंगमंचावर सादर झालेल्या महानाट्याने उपस्थित रसिकांच्या डोळ्याचे पारणे फेडले.

'श्री गोविंदा कल्चरल अँड सोशल फाउंडेशन'च्या वतीने हे 'श्री बालाजी महानाट्य' सादर करण्यात आले. या महानाट्यात तब्बल २५० हौशी कलाकार, ७० हून अधिक नृत्य कलाकार, घोडे, रोबोटिक हत्ती, आदींचा सहभाग आहे.

पंढरपूर येथे उभारण्यात येत असलेल्या मंदिर निर्माण निधीसाठी 'श्री गोविंदा कल्चरल अँड सोशल फाउंडेशन'च्या वतीने पुण्यात पहिल्यांदाच 'श्री बालाजी महानाट्य' सादर करण्यात येत आहे.

या महानाट्याचे उद्घाटन श्री त्रिदंडी श्रीमन्नारायण रामानुज चिन्ना जेयर स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उद्योजक नितीन चोरडिया, बिगबॉस फेम अभिनेते अभिजीत बिचुकले, महानाट्याचे लेखक, दिग्दर्शक विशाल दीपक धुमावत आणि ड. सनी रवींद्र कोळपकर आदी उपस्थित होते.

यावेळी श्री त्रिदंडी श्रीमन्नारायण रामानुज चिन्ना जेयर स्वामी म्हणाले, भारतात भगवान व्यंकटेश यांना दक्षिणेत श्री बालाजी नावाने तर उत्तरेत हनुमानाला बालाजी म्हणून ओळखले जाते. अनेक जण श्री बालाजी यांच्या मंदिरात देखील जावून येतात पण त्यांना बालाजीचा इतिहास माहीत नसतो. ते सांगण्याचे काम हे महानाट्य करत आहे.

कलयुगात श्री बालाजी भगवान हे मूर्त रुपात आपल्यात असून आपल्याला आशीर्वाद देत आहेत.

रामलल्ला प्रमाणे त्यांची मूर्ती देखिल मोहक आहे. अशाच एका मंदिर निर्माणासाठी हे महानाट्य सादर होत आहे. दरम्यान, श्री बालाजी महानाट्य येत्या ११ फेब्रुवारी पर्यंत दररोज सायंकाळी ५ वां. शांती नगर, कोंढवा येथील चोरडिया कॉर्नर मैदानात सादर होणार आहे.

# अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या पुणे जिल्हा अध्यक्षपदी प्रा. सुरेश वाळेकर यांची निवड

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील तालुके गावे शाळा, महाविद्यालये अशा ठिकाणी उत्तम प्रकारची साहित्य संमेलने, व्याख्यानमाला, सामाजिक प्रबोधन या माध्यमातून विचाराची ज्ञानगंगा वाहवी, तरुणांना ज्ञानाचा प्रकाश मिळावा या हेतूने पुणे जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात उत्कृष्ट दर्जाची संमेलने व्हावीत, अशी अपेक्षा अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष व सुप्रसिध्द साहित्यिक शरद गोरे यांनी व्यक्त केली.

सुलोचनाताई झेंडे सेमी इंग्लिश मिडीयम स्कूल कुंजीवाडी येथे साहित्य परिषद पदग्रहण संमारंभात बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे सूर्यकांत नामगुडे (पुणे विभागीय अध्यक्ष) किशोर टिळेकर (सुप्रसिध्द कवी) आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे पुणे जिल्हा पूर्व जिल्हाध्यक्षपदी प्रा. सुरेश वाळेकर यांची निवड झाली. ज्योती दिलीप सराटे यांची महिला आघाडी अध्यक्षपदी शुभांगी घुले उपाध्यक्षा, सुनिल थोरात उपाध्यक्ष, सागर कांबळे कार्याध्यक्ष, धनंजय पवार उपाध्यक्ष तर ऋतुजा पवार सहकार्याध्यक्षा पदी निवड करण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी नाडे यांनी केले. प्रास्ताविक सुनील थोरात व सुरेश वाळेकर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार शीतल गायकवाड यांनी मानले.



# कोल्हापुरला जोडणाऱ्या घाटरस्त्यांचे काम दोन महिन्यात मार्गी : रविंद्र चव्हाण

**कोल्हापूर :** कोकण आणि कोल्हापूरला जोडणाऱ्या घाटरस्त्यांच्या कामांमध्ये येणाऱ्या अडचणी येत्या दोन महिन्यात मार्गी लागून या रस्त्यांच्या कामाला सुरुवात होईल असे सांगून सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी राज्यातील साकवाच्या जागी पूलनिर्मितीसाठी १३०० कोटी रुपयांचा निधी अंदाजपत्रकात घेउन या साकवाच्या प्रश्नाला कायमचा पूर्णविराम देणार आहे, असे जाहीर केले.

कोल्हापूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध विकास कामांचा आभासी पध्दतीने लोकार्पण आणि कोल्हापुरातील शासकीय विश्रामगृहाच्या नूतनीकरणाचा प्रारंभ गुरुवारी मंत्री चव्हाण आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते फित कापून झाला. यावेळी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे उपाध्यक्ष आमदार प्रकाश आबिटकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी विविध विकास कामांची चित्रफीत दाखवण्यात आली.

मंत्री चव्हाण म्हणाले,अनेक वर्षापासून कोकणाला जोडणाऱ्या घाटरस्त्याचे प्रलंबित कामे मार्गी लागणार आहेत. वनखाते आणि बांधकाम खाते यांच्यात बैठक झाली असून येत्या दोन महिन्यात या कामांना प्रारंभ होणार आहे, दोन्ही बाजूंच्या अडचणी दूर करण्यात येतील. जिल्हाधिकाऱ्यांच्या मदतीने मोजणीसाठी पैसे भरण्यात आले असून हे काम अंतिम टप्प्यात असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. कोकणातील साकव दुरुस्तीचा प्रलंबित प्रश्न अधिवेशनात मंजूर केला. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात यासाठी १३०० कोटी रुपयांची तरतूद करुन हा प्रश्न निकाली काढला जाईल. पूर्वी साकवासाठी ३५ लाख रुपये दिले जात, आता त्यासाठी १ कोटी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे चव्हाण यांनी सांगितले.

भाजपचे राजवर्धन निंबाळकर यांनी प्रास्तविक केले. माजी आमदार अमल महाडिक यांनी अंबाबाईची प्रतिमा देउन चव्हाण यांचे स्वागत केले. आमदार प्रकाश आबिटकर यांनी शिवडाव घाट तसेच जिल्ह्यातील आणखी रस्ते कामाच्या उद्घाटनासाठी मंत्री चव्हाण पुन्हा येतील असे

# सावळज येथे तरुणाचा निर्घृण खून

## प्रेम विवाह केल्याच्या संशयावरून खून केल्याचा नातेवाईकाचा आरोप ; चारजण ताब्यात

**तासगाव :** सावळज (ता . तासगाव ) येथील तरुणांचा निर्घृण खून करण्यात आला आहे.भारत उर्फ संतोष संजय पाटील ( वय २९) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. हा प्रकार बुधवारी रात्री पावणे दहा वाजता उघडकीस आला.या प्रकरणी मृत भारत ची आई वैशाली संजय पाटील यांनी तासगाव पोलिसात फिर्याद दाखल केली आहे.खुनाचे कारण अस्पष्ट असले तरी फिर्यादी यांनी संतोष याने प्रेम विवाह केला असल्याने त्याचा खून केला असावा असा संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी संशयित म्हणून चार जणांना पोलिसानी



ताब्यात घेतले आहे.

या बाबत पोलिसातून मिळालेली अधिक माहिती अशी : फिर्यादी वैशाली पाटील यांनी या खुन प्रकरणी मृत संतोष पाटील यांचा मेहुणा ओंकार शिवाजी पाटील आणि अन्य नातेवाईक याच्यावर दिलेल्या फिर्यादीत संशय व्यक्त केला आहे.

मृत संतोष हा ट्रॅक्टर चालक म्हणून काम करीत होता. सावळज बिरणवाडी रस्त्यावरील एका मळ्यात कुटूंबासह रहायला आहे .बुधवारी सायंकाळी तो घरातून बाहेर गेला होता. रात्री तो उशिरा घरी आला नसल्याने घरच्यांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता, मृत संतोष हा घराकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर जखमी अवस्थेत आढळून आला. त्याच्या डोक्याला पाठीमागे जोराचा आघात झाल्याने घटना स्थळी मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याचे दिसत होते. नातेवाईकांनी त्याला जखमी अवस्थेत तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविले मात्र तत्पर्वीच त्याचा मृत्यू झाला.

ज्या ठिकाणी संतोष जखमीअवस्थेत आढळून आला त्याठिकानीच त्याची दुचाकी उभी केलेल्या स्थितीत आढळून आली आहे.हल्लेखोराने त्याच्या डोक्यात पाठीमागे मारल्याने डोक्यात मोठा आघात झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटना स्थळी जाऊन घटनेची माहिती घेतली. संशायितांचा घराची झडती घेण्यात आली. या वेळी मृत संतोष याच्या आईने काही संशयितांची नांवे घेतल्याने पोलिसांनी काही वेळातच संशयितांना ताब्यात घेऊन त्याच्या कडे कसून चौकशी सुरू केली आहे. घटना स्थळी पोलीस उपअधीक्षक सचिन थोरबोले , यांनी हा भेट देऊन तपसासबंधी सूचना केल्या.स्थानिक गुन्हे अन्वेषण चे पथकाने घटना स्थळी भेट देऊन तपासाची सूत्रे हातात घेतली आहे.

मृत संतोष याने भावकितीलच एका मुलीशी अडीच वर्षा पूर्वी प्रेम विवाह केला आहे.त्यावेळे पासून या दोन कुटूंबात कटुता होती. त्यातून ही घटना घडली का या शिवाय या खुना मागे अन्य काही कारण आहे याचा पोलीस शोध घेत आहेत.

# घड्याळ चिन्ह झाले २३ वर्षाने अदृश्य

(अजित जगताप)

**सातारा :** महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये धक्का तंत्र वापरून १९९९ साली राष्ट्रीय काँग्रेसच्या हाताचा पंजा चिन्ह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अचूक वेळ साधत सोडला व घड्याळ चिन्ह घेऊन पक्षाची स्थापना केली. केंद्र व राज्य सरकारमध्ये सक्रिय सहभाग घेतला .ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार साहेब यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये २३ वर्षांनी फूट पडल्यानंतर या पक्षाचे सातारा जिल्हा राष्ट्रवादी भवन मधील घड्याळ व त्याचे काटे अदृश्य झाले आहेत







**एकेकाळी साताऱ्यातील राष्ट्रवादी भवन मध्ये घड्याळ हे चिन्ह अस्तित्व दाखवत होते आता या भवन मधील घड्याळ व त्याचे काटे अदृश्य झाल्याचे पाहून अनेक जणांचे डोळे पानावले होते ( छाया- अजित जगताप, सातारा)**

आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रवादी भवन या कार्यालयावर दुपारी महिला आघाडीच्या वतीने कविता मेहेत्रे संजना जगदाळे समिंदरा जाधव, नलिनी जाधव, मोहिनी मिसाळ प्रज्ञा गायकवाड शैलेजा जाधव कदम नुपूर नारनवरे मेघा नलवडे, तेजस्विनी केसरकर डॉक्टर प्रियांका माने अर्चना सोनवणे रूपाली ननावरे अनुराधा तरटे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या इतर महिला व

कार्यकर्त्यांनी निवडणूक आयोगाचा निषेध केला. तसेच मनुवादी विचारसरणीच्या भाजप सरकार विरोधातही घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला.

या घोषणाबाजी मुळे काही काळासाठी भाजप समर्थक राष्ट्रवादी भवन च्या आजूबाजूला उभे राहिले होते. परंतु, त्या ठिकाणी मिरची विक्रेते असल्यामुळे मिरची व या घोषणाबाजीचाही चांगलाच झटका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विरोधक समर्थकांना बसला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून फुटून सत्तेसाठी अजित पवार यांनी वेगळा गट केला. त्यामुळे संतप्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याही नाव घेऊन त्यांचे विरोधात घोषणा दिल्या. आज राष्ट्रवादी भवन मध्ये असलेले अजित दादा पवार यांची प्रतिमाही हटवण्यात आली. गेली २३ वर्ष सातारा येथील राष्ट्रवादी भवन मध्ये पवार कुटुंबीयांचे वर्चस्व होते परंतु आता त्यापैकी शरदचंद्र पवार साहेबांचे पुतणे अजित दादा पवार यांनी वेगळा गट केल्यामुळे त्यांचे राजकीय अस्तित्व या राष्ट्रवादी भवन मधून पुसण्यास सुरुवात झालेली आहे. ही काळाची महिमा असून आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजितदादा पवार गटाने सातारा लोकसभा मतदारसंघाची मागणी केली होती त्याला खिळ बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# मराठा आरक्षणासाठी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन : भुजबळ

**मुंबई :** महाराष्ट्रात मराठा विरुद्ध ओबीसी संघर्ष चिघळत असतानाच मराठा आरक्षणाबाबत मोठी बातमी समोर येत आहे. १५ फेब्रुवारी विधिमंडळाचे मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलावल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी प्रसारमाध्यमांना दिली. या अधिवेशनात मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्यावे, अशी मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**विशेष अधिवेशन :** मराठा आरक्षणासाठी विधिमंडळाने १५ फेब्रुवारीला विशेष अधिवेशन बोलावले आहे. कुणबींची ओबीसी प्रवर्गात घुसखोरी होत आहे, त्याऐवजी त्यांना वेगळे आरक्षण द्यावे, अशी मागणी विधिमंडळाच्या १५-१६ फेब्रुवारीला होणाऱ्या विशेष अधिवेशनात करणार असल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. त्यामुळे मराठा समाजासाठी मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात नवीन अधिसूचनेवर या अधिवेशनात चर्चा होणार आहे. कुणबीतील सगे सोयरे प्रमाणपत्र तसंच मागासवर्ग आयोगानं सादर केलेल्या अहवालावर अधिवेशनात चर्चा होईल. मनोज जरांगे पाटील यांनी १० फेब्रुवारीपासून आमरण उपोषणाचा अल्टिमेटम दिला आहे. तो अजूनही कायम आहे.

जरांगे खरे पाटील असेल तर : मनोज जरांगे पाटील यांनी नाशिकमध्ये माध्यमांशी बोलताना छगन भुजबळांनी मराठा समाजाच्या नवीन अध्यादेशाविरोधात भूमिका घेतली, तर मंडल आयोगाला चॅलेंज करू असं म्हटलं होतं. त्यावर प्रतिक्रिया देताना भुजबळ म्हणाले जरांगे खरे पाटील असतील, त्यांनी मंडल आयोगाविरोधात भूमिका घेऊन दाखवावी. जरांगे पाटील स्वत:ला काय समजतात. इथं हुकुमशाही आहे का? इथं लोकशाही आहे. तसंच भुजबळांनी जरांगे पाटील यांचा एकेरी उल्लेख केलाय.

# राहुल गांधीनी केला संपूर्ण ओबीसी समाजाचा अपमान !



**नवी दिल्ली :** काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचा जन्म ओबीसीत झाला नसून गुजरात मधील तेली जातीत झालेला आहे, असा तिरपागडा आरोप करून संपूर्ण ओबीसी समाजाचा अपमान केला असल्याने भाजपाने त्यांच्याविरुद्ध कंबर कसली असून शुक्रवारी राज्यभर निषेध आंदोलन घोषित केले.भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशच्यावतीने नागपूर येथे संविधान चौकात तसेच प्रत्येक जिल्हा व तालुका केंद्रावर शुक्रवार, ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.०० वा निषेध आंदोलन करणार असल्याची घोषणा भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश प्रभारी डॉ. आशिष देशमुख यांनी केली. या आंदोलनात भारतीय जनता पार्टी, ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

राहुल यांचे निर्लज्ज विधान

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचा जन्म ओबीसीत झाला नसून गुजरात मधील तेली जातीत झालेला आहे, गुजरातमध्ये सन २००० मध्ये ओबीसीत आणली असून मोदी यांचा जन्म सामान्य जातीत झाला. त्यांनी जातीनिहाय जनगणनेला (कास्ट सेन्सस) विरोध केला कारण त्यांचा जन्म ओबीसीत झालेला नसून सामान्य जातीत झालेला आहे असे बेताल व निर्ल्लज उदगार काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी ओरिसातील सभेत काढले असून, राहुल यांचा हा उद्दामपणा म्हणजे समस्त ओबीसी समजाचा अपमान आहे, असा आरोप आशिष देशमुख यांनी केला.

ओबीसी विरोधात षडयंत्र!

नागपूर येथे ते पत्रकार परिषदेत बोलत होते. ते म्हणाले, राहुल गांधी हे गांधी कुटुंबात जन्माला आले असून त्यांचा इटालियन कुटुंबाशी संबंध आहे. या लॉजिक प्रमाणे ते स्वत: भारतीय नागरिक ठरू शकत नाही. काँग्रेस नेहमीच ओबीसी आरक्षण विरोधात राहिली आहे. पंडीत नेहरू यांनी सन १९५३-५४ मध्ये काकासाहेब कालेलकर आयोगाने केलेल्या शिरफारशींचा विरोध केला होता. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांनी मंडल आयोगाला विरोध केलेला आहे. इंदिरा गांधीनी मंडल आयोग रद्दीत टाकला होता.

डॉ. देशमुख म्हणाले की, राहुल गांधीच्या मते ओबीसी अंतर्गत अनेक जाती आरक्षणास पात्र नाहीत; कारण त्या सर्व पूर्वी सामान्य वर्गात होत्या. पुन्हा एकदा गांधी परिवार ओबीसी विरोधात षडयंत्र रचत आहे. एखाद्या जातीची ओबीसी विभागणी होण्यापूर्वी ज्या व्यक्तीचा अशा जातींमध्ये जन्म झाला त्यांचे आरक्षण राहुल गांधी काढून घेण्याच्या तयारीत आहे. काँग्रेस तेली समाजाला ओबीसी पासून वेगळे करण्याचा आणि ओबीसींचा एक वर्ग कमकुवत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. इतके वर्ष धर्म आणि जातीवरून फूट पडून ते आता ओबीसीमध्ये सुध्दा फूट पाडत आहेत, असा आरोप आशिष देशमुख यांनी केला.

अनेक राज्यात काँग्रेसने ओबीसीचे आरक्षण कमी करून मुस्लिमांना हे आरक्षण देण्याचे प्रकार केलेले आहे. ओबीसी आयोगाला संविधानिक दर्जा काँग्रेसने कधीही दिलेला नाही. युपीए -२ च्या सरकारमध्ये संपूर्ण कॅबिनेटमध्ये मंत्री म्हणून केवळ एकाच ओबीसी व्यक्तीला स्थान देण्यात आले होते. महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ओबीसींना आरक्षण देता आले नाही. धनगरांच्या आणि गोवारी जमातीचा अनुसूचित जमाती आरक्षणाबद्दल काँग्रेसनेच घोळ निर्माण करून ठेवला आहे, असेही ते म्हणाले.पत्रकार परिषदेला ओबीसी मोर्चा अध्यक्ष संजय गाते, आ. कृष्णा खोपडे, भाजपा नागपूर शहराध्यक्ष बंटी कुकडे, नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, अर्चना डेहनकर, प्रशांत पाटील, रवींद्र चव्हाण, डी. डी. सोनटक्के, कमलाकर घाटोळे, नितीन गुडधे (पाटील), रवींद्र येनुरकर, शालिक नेवारे, विजय वासेकर श्रावण फरकाडे, सुनील हिरणवार, दिलीप ठाकरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# शिवसेना ठाकरे गटाच्या दहिसरमधल्या माजी नगरसेवकावर गोळीबार



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे दहीसरमधील माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्यावर गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. अभिषेक घोसाळकर यांना करुणा रुग्णालयात दाखल करण्यात आलंय. अभिषेक घोसाळकर यांच्यावर सहा गोळ्या झाडण्यात आल्या. शिवसेना नेते आणि माजी आमदार विनोद घोसाळकर यांचा अभिषेक हे पूत्र आहेत. अभिषेक घोसाळकर मॉरिस भाई नावाच्या व्यक्तीबरोबर फेसबूक लाईव्ह करत होते. फेसबूक लाईव्ह दरम्यान मॉरिसने अभिषेक घोसाळकर यांच्यावर गोळ्या झाडल्याचं पोलिसांनी सांगितलं. गोळीबाराचा हा थरार फेसबूक लाईव्हमध्ये कैद झाला. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

अभिषेक घोसाळकर यांच्यावर गोळीबार केल्यानंतर मॉरिसने स्वत:वरही गोळीबार करत आत्महत्या केल्याची माहिती आहे. पैशांच्या वादातून हा प्रकार घडल्याचं समोर आलं आहे. फेसबुक लाईव्ह करत अभिषेक घोसाळकर आणि मॉरिस यांनी लोकांशी संवाद साधला. अभिषेक घोसाळकर लाईव्ह संवाद साधत असताना मॉरिस तिथून उटला आणि त्याने अभिषेक घोसाळकरवर सहा गोळ्या झाडल्या. अभिषेक घोसाळकर यांच्या पोटात गोळ्या लागल्या.

**फेसबूक लाईव्हमधून संवाद**

फेसबूक लाईव्हमध्ये अभिषेक घोसाळकर मुंबई ते नाशिकआणि नाशिक ते मुंबई बसेस सोडण्याविषयी सांगत होते. तसंच सर्वांनी एकत्र काम करुयात असंही म्हणताना दिसातयत. आयसी कॉलनी, गणपत नगर, कांदळपाडा परिसरात चांगलं काम करायचं आहे. ही सुरुवात आहे, पुढे अजून काम करायचं आहे असंही अभिषेक घोसाळकर म्हणताना दिसतायत. आपलं भाषण संपवून ते तिथू उठले तितक्यात त्यांच्यावर मॉरीसने गोळीबार केला. विनोद घोसाळकर यांना तातडीने जवळच्या करुणा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

अभिषेक घोसाळकर हे माजी नगरसेवक होते, आताच्या टर्मम ध्ये त्यांच्या पत्नी नगरसेविका होत्या. त्यांचे वडील विनोद घोसाळकर हे माजी आमदार राहिले आहेत. बोरीवली मतदार संघात घोसाळकर कुटुंबाची राजकीय ताकद आहे.

आदित्य ठाकरे यांचा हल्लाबोल

या घटनेवर आदित्य ठाकरे यांनी शिंदे सरकारवर हल्लाबोल केला आहे. अभिषेक घोसाळकर संध्याकाळी पाच वाजता मातोश्रीवर बैठकीसाठी आले होते. आमची बैठक झाली आणि त्यांच्यावर गोळीबार झाल्यची घटना घडली आहे. राज्यात गुंडाराज सुरु असल्याचं आदित्य ठाकरे यांनी म्हटलंय.

गणपती मिरवणूकीत गोळीबार करणाऱ्या व्यक्तीला मिंदेंनी सिद्धविनायक न्यासाचा अध्यक्ष केलं आहे. हे हिंदुत्व तुम्हाला मान्य आहे का असा सवाल आदित्य ठाकरे यांनी विचारला आहे. या गद्दार आमदारांना विधानसभेची पायरी चढू देणार नाही, येणार सरकार हे आमचं आहे अशी गर्जना आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

# वस्त्रोद्योग विभागातील पात्र उमेदवारांना आवाहन



मुंबई : सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिनस्त विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, पुणे विभागांतर्गत निम्नश्रेणी लघुलेखक पदाच्या व्यावसायिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी सहकार आयुक्त यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या पदासाठी अर्ज केलेले उमेदवार व्यावसायिक चाचणी परीक्षा कोणत्या माध्यमातून (मराठीइंग्रजी) देणार आहेत, याबाबतचा तपशील भरण्यासाठी दि. ५ ते ११ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत ऑनलाईन अर्ज उपलब्ध करुन देण्यात आला आहे. संबंधित उमेदवारांनी लॉगिन करून, टॅब्स ओपन करुन व्यावसायिक परीक्षेचे भाषा माध्यम नोंदवावे, असे आवहान योगीराज सुर्वे, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांनी केले आहे.

# बांधकामांसाठी १३०० कोटींचा निधी : मंत्री रवींद्र चव्हाण

## सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत चिरकाल टिकणारी विकासकामे करा



**कोल्हापूर :** राज्यातील साकव बांधकामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला १३०० कोटींचा निधी देण्यात येईल. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत चिरकाल टिकणारी विकासकामे करा, ही कामे दर्जेदार पद्धतीने करुन कोणत्याही कामाविषयी नागरिकांना तक्रार करण्याची संधी देवू नका, अशा सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी केल्या.

कोल्हापूर जिल्ह्यातील शासकीय विश्रामगृहाचे नूतनीकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने जिल्ह्यात झालेल्या विविध विकासकामांचे आभासी पद्धतीने लोकार्पण सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. चव्हाण यांच्या हस्ते व पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली फित कापून करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तथा आमदार प्रकाश आबीटकर, माजी आमदार अमल महाडिक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता शामराव कुंभार, कार्यकारी अभियंता संजय पाटील, सत्यजित कदम, महेश जाधव, राहुल चिकोडे, राजवर्धन निंबाळकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील विविध विकास कामांची चित्रफित दाखविण्यात आली.

मंत्री श्री. चव्हाण म्हणाले की, कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने अनेक विकासकामे मंजूर करण्यात आली आहेत. 'सारथी' उपकेंद्राची इमारत व याठिकाणी ५०० मुले व ५०० मुलींचे वसतीगृह, ग्रंथालय बांधकामासाठी १७६ कोटी रुपये, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इमारतीसाठी १७४ कोटी, सीपीआर मधील विविध इमारतींच्या दुरुस्तीसाठी ४३ कोटी, दत्तवाड येथील ग्रामीण रुग्णालयाला १६ कोटी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ऑडिटोरियम अंतर्गत विविध कामांसाठी ९ कोटी ५० लाख रुपये यांसह अनेक कामांसाठी मंजूरी देण्यात आली असून ही कामे लवकरच सुरु होत आहेत, असे सांगून श्री अंबाबाई मंदिर परिसराच्या विकासासाठी १ हजार कोटी रुपयांचा विकास आराखडा प्रस्तावित करण्यात आला असून यालाही शासन स्तरावर मंजूरी देण्याची कार्यवाही सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभागात काम करताना राष्ट्रसेवेची संधी समजून उत्तम काम करा, असे आवाहन त्यांनी या विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना केले.

आमदार प्रकाश आबिटकर म्हणाले की, कोणत्याही भागाचा विकास होण्यासाठी रस्त्यांचे जाळे निर्माण होणे गरजेचे असते. केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक रस्त्यांची कामे मंजूर केली आहेत. जिल्ह्यासह राज्यातील रस्ते दर्जेदार पद्धतीने तयार व्हावेत, यासाठी बांधकाम विभागाकडून भरघोस निधीची तरतूद व्हावी.

वाढत्या शहरीकरणाच्या दृष्टीने शहरांतर्गत रस्तेही चांगल्या पद्धतीने व्हावेत, पुलांची उंची वाढवावी, अशी अपेक्षा माजी आमदार अमल महाडिक यांनी व्यक्त केली.

अधीक्षक अभियंता शाम राव कुंभार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या व भविष्यात करण्यात येणाऱ्या विविध कामांची माहिती दिली. कार्यकारी अभियंता प्रवीण जाधव यांनी आभार मानले.

# आपत्तीचे पूर्वसूचना देणाऱ्या स्वत:च्या 'सॅटेलाईट' साठी शासन प्रयत्नशील : अनिल पाटील

**जळगाव :** व?िकस?ित देशांमध्ये कोणत्याही नैसर्ग?िक आपत्तीची पूर्वसूचना देणारे तंत्रज्ञान आहे. यामुळे तेथील नागर?िक, शेतकरी यांना नैसर्ग?िक संकटांपासून सतर्क करता येते. त्यातून आर्थ?िक व जीवीत हानी ही टाळता येते. यादृष्टीने तंत्रज्ञानाची कास धरत महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन व?िभागाचे स्वत:चे सॅटेलाईट असावे. यासाठी मदत व पुनर्वसन व?िभाग प्रयत्न करत आहे. अशी माहिती राज्याचे मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी आज येथे द?िली. कव??य?ित्री बह?िणाबाई उत्तर महाराष्ट्र व?िद्यापीठात महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन, संशोधन आण?ि प्रश?िक्षण संस्था स्थापन करण्याच्या प्रस्तावाचा शासन सकारात्मक व?िचार करेल. अशी ग्वाही ही त्यांनी यावेळी द?.

महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगाव जिल्हा प्रशासन आणि कवयित्री बह?िणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र व?िद्यापीठामार्फत 'उष्मालाट पूर्वतयारी व सौम्यीकरण व्यवस्थापन' या व?िषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सिनेट सभागृहात होणाऱ्या या दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांच्या हस्ते आज झाले. याप्रसंगी व्यासपीठावर कव?िय?त्री बह?िणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र व?िद्यापीठाचे कुलगुरू डॉ.महेश्वरी, आपत्ती व्यवस्थापन व?िभागाचे संचालक आप्पासो धुळाज, ज?िकारी आयुष प्रसाद उपस्थ?ित होते. या कार्यशाळेत अपर मुख्य सचसिुजाता सौन?िक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन व?िभागाच्या प्रधान सचिव डॉ.सोन?िया सेठी मंत्रालयातून ऑनलाईन उपस्थिती होत्या.

आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील म्हणाले की, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यातील काही भाग उष्णतेच्या लाटेने होरपळत असतो. शेतकरी, शाळकरी मुले व रस्त्यावरील विक्रेते यांना उन्हाच्या लाटेचा थेट सामना करावा लागतो. कार्यशाळेचे म ाध्यमातून अधिकाऱ्यांनी स्वत:ची कल्पकता व सूचनांची मांडणी करावी. निर्णयापर्यंत जाण्यासाठी अनुभवांचे आदान-प्रदान झाले पाहिजे. उष्मा लाट का येते , कशी येते याची कार्यशाळेत कारणांमिमासा झाली पाहिजे. जनजागृतीच्या माध्यमातून मृत्यू दर कमी करता येईल.

शेती व रोजगाराचे उष्णतेच्या लाटेपासून संरक्षण व्हावे यासाठी जनजागृती करण्याची गरज आहे. मृत्यू दर कमी कसा होईल यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभाग सातत्याने प्रयत्न करत आहे. शेतकऱ्यांचे संरक्षण झाले पाहिजे यासाठी शासन प्रयत्न करत आहे. असे ही त्यांनी यावेळी सांग.

कुलगुरू श्री.माहेश्वरी म्हणाले की, हवामान बदल, जलवायू परिवर्तनाची समस्या जगात उद्भवत आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात राज्यशासनाच्या वतीने राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

श्रीमती सौनिक म्हणाल्या की, उष्णतेच्या लाटेमुळे नागरिक व प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. जिल्ह्यातील हवामानाचे बदल प्रशासनाने समजून घेतले पाहिजे. उष्णतेच्या लाटेबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती करण्याची गरज आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून आलेल्या सूचनांचा राज्यस्तरीय कृती आराखड्यात समावेश केला जाईल.

श्रीमती सेठी म्हणाल्या की, राज्यातील २२ जिल्ह्यात उष्मा लाटेचा उन्हाळ्यात प्रभाव असतो. आपले उद्दिष्ट शून्य मृत्यू हे धोरणावर काम करणे आवश्यक आहे. उन्हापासून

# माध्यमातून देशाचे नाव उज्ज्वल करणारे खेळाडू घडावेत : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**ठाणे :** क्रीडा संकुलांच्या माध्यमातून देशाचे नाव उज्ज्वल करणारे खेळाडू घडावेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज कोपरी येथील ठाणे तालुका क्रीडा संकुल उद्घाटन सोहळयाप्रसंगी केले.

ठाणे शहरातील तालुका क्रीडा संकुलाचे उद्घाटन कोनशिलेचे अनावरण मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते आज झाले.

यावेळी आमदार प्रताप सरनाईक, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त अभिजित बांगर, माजी आमदार रवींद्र पाठक, माजी महापौर नरेश म्हस्के, क्रीडा उपसंचालक नवनाथ फरताडे, तहसीलदार युवराज बांगर, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, तालुका क्रीडा अधिकारी तथा तालुका क्रीडा संकुलाच्या सदस्य सचिव सायली जाधव आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी आनंदाचा दिवस आहे. खेळाडू आणि एक तंदुरुस्त पिढी घडविणाऱ्या या संकुलाचे उद्घाटन होत आहे. ठाण्याचा पालकमंत्री असल्यापासून या संकुलाच्या उभारणीचा साक्षीदार असून आज मुख्यमंत्री म्हणून त्याचे उद्घाटन करण्याचे भाग्य मिळाले आहे. या क्रीडा संकुलाच्या माध्यमातून नवनवीन खेळाडूंना कसब दाखविण्याची संधी मिळेल. त्यातून ते जिल्हा, राज्य आणि देशाचे प्रतिनिधीत्व करतील.

मुख्यमंत्री म्हणाले की, ठाण्याला खेळ आणि खेळाडूंच्या विजयाचा मोठा इतिहास आहे. देशात आणि राज्यात नावाजलेले अनेक खेळाडू ठाण्यात झालेले आहेत. हनुमान व्यायाम शाळा, आनंद भारती, मावळी मंडळ, आर्य क्रीडा मंडळ या काही निवडक ठिकाणीच खेळण्याची संधी असे. व्यायाम करणे, स्थानिक स्पर्धामध्ये पदके मिळवण्यापलिकडे कुणी खेळाकडे गांभीर्याने पाहत नव्हते. ही उणिव दादोजी कोंडदेव स्टेडियममुळे भरुन निघाली. तिथे आता ॲथलेटिक्सचे ६ ट्रॅक आखले गेले. उंच उडी, लांब उडी, गोळाफेक आदी खेळांना उत्तम व्यासपीठ मिळाले. क्रिकेटसाठी दोन खेळपट्ट्या तयार केल्या. दरवर्षी ॲथलेटिक्स, टेबलटेनिस, बॅडमिंटन, क्रिकेट, कब्बड्डी, खो-खो इ. खेळांच्या राज्य व राष्ट्रीयस्तरावरील महापौर करंडक स्पर्धा ठाण्यात होतात. मॅरेथॉनला उदंड प्रतिसाद मिळतो.

ठाणे तालुका क्रीडा संकुल हे या क्रीडा क्षेत्रातील पुढील पाऊल आहे. काळाची गरज ओळखून अत्याधुनिक सुविधांसह खेळाडू घडविण्याचे काम इथे होणार आहे. राज्यात खेळ आणि खेळाडूंना पोषक असे वातावरण आहे. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी 'श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ' स्पर्धेचा शुभारंभ केला आहे. गेल्या महिन्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नाशिक येथे युवा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील सर्वच राज्यातील युवा आणि खेळाडू त्यात सहभागी झाले होते. विशेष म्हणजे तब्बल सात वर्षानंतर राष्ट्रीयस्तरावरचा हा युवा मेळावा आयोजित करण्याची संधी राज्याला मिळाली. ती आपण यशस्वी करून दाखवली.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणारी पुढची पिढीही तितकीच सक्षम आणि तंदुरूस्त असणं आवश्यक आहे. त्यासाठी विविध क्रीडा स्पर्धा, युवा मेळावे आयोजनासाठी प्रयत्न करीत आहोत. ठाण्याचा सुपूत्र रुद्रांक्ष पाटीलने आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत देश आणि राज्याचे नाव मोठे केले. रुद्रांक्ष सारखेच अनेक गुणवान खेळाडू राज्यात आहेत. ते आपल्या जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर झळकवत आहेत. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये देखील आपल्या राज्यातील खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली आहे. राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंना संधी मिळावी, यासाठी सरकार प्रोत्साहन देत आहे. मातीतल्या खेळांची परंपरा महाराष्ट्राला आहे. त्यातून शरीर तंदुरुस्त राहतेच पण मुलांची व्यक्तिमत्वाची जडणघडण होते.

मोबाईल, इंटरनेटच्या युगात मुले मैदानांपासून दुरावली आहेत, मुलांना पुन्हा मैदानी खेळाकडे आकर्षित करणे गरजेचे आहे. त्यात पालकांची जबाबदारी मोठी आहे. त्यांनी मुलांना खेळासाठी प्रोत्साहित करायला पाहिजे. सरकारही आपली जबाबदारी झटकणार नाही. शासनाच्या क्रीडा धोरणानुसार प्रत्येक तालुक्यात तालुका क्रीडा संकुल बांधण्यात येत आहे. ठाणे तालुक्यात तालुका क्रीडा संकुल निर्माण करण्यात आले आहे. कळवा येथे क्रीडा विभागाला ४८ एकर जागा दिली आहे. भिवंडी, शहापूर, मुरबाड या तालुक्यांमध्ये देखील तालुका क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे.

उल्हासनगर, अंबरनाथ, कल्याण येथील तालुका क्रीडा संकुलांचा मेकओव्हर सुरू आहे. या सर्व क्रीडा संकुलांचा लाभ ठाणे जिल्ह्यामधील सर्व खेळाडूंना होईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०३६ मधील ऑलिम्पिक स्पर्धासाठी भारत तयार असल्याचे जाहीर केले आहे. ऑलिम्पिंक स्पर्धेतले खेळाडू घडविण्यासाठी ही संकुले उपयुक्त ठरतील. हेच मिशन डोळ्यासमोर ठेवत 'मिशन लक्ष्यवेध' राबवत आहोत. राज्यात क्रीडा क्षेत्राला अधिक बळकटी देण्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत त्यामध्ये तालुका, जिल्हा, विभागीय क्रीडा संकुलांच्या निधीत वाढ करण्यात आली आहे. बालेवाडी पुणे येथे स्पोर्टस सायन्स सेंटर उभारले जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथे नवीन क्रीडा विद्यापीठास ५० कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. खेळांडूच्या प्रोत्साहनासाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार विजेत्या खेळाडूंच्या पुरस्कार रकमेत वाढ करण्यात येणार आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील (एशियन गेम्स) पदक विजेते खेळाडू आणि मार्गदर्शकांना देण्यात येणाऱ्या पारितोषिक रकमेत दहापट वाढ करण्यात आली आहे. जिल्ह्यातील मुला-मुलींनी विकसित करण्यात आलेल्या या सुविधांचा वापर करावा आणि क्रीडा क्षेत्रात आपली चमक दाखवावी, असेही ते म्हणाले.

जिल्हाधिकारी श्री. शिनगारे म्हणाले की, शासनाच्या सन २०१२ च्या क्रीडा धोरणानुसार प्रत्येक तालुक्यात तालुका क्रीडा संकुल बांधण्यात येत आहे. त्यानुषंगाने ठाणे तालुक्यात तालुका क्रीडा संकुल निर्माण करण्याकरिता क्रीडा विभागाला शासनाकडून २९८५.२९ चौरस मीटर जागा उपलब्ध करून देण्यात आली. शासनाकडून मिळालेला निधी १ कोटी असून त्यामध्ये या संकुलाचे बांधकाम पूर्ण होऊ शकत नाही म्हणून तत्कालीन पालकमंत्री तथा मंत्री, नगरविकास, एकनाथ शिंदे यांनी नगरविकास विभागाचा ९ कोटी निधी उपलब्ध करून दिला. या तालुका क्रीडा संकुलास बांधण्यासाठी ४ कोटी अनुदान प्राप्त झाले असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध खेळांची प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अमृता दीक्षित यांनी केले तर, आभार प्रदर्शन क्रीडा उपसंचालक श्री. फरताडे यांनी केले.

# संबंधित जागा मालकांच्या नावे करा : पालकमंत्री हसन मुश्रीफ



**कोल्हापूर :** कागल तालुक्यातील कुरुकली येथील ७७ नागरिकांच्या नावे भूखंड करण्याची प्रक्रिया गतीने राबवा. तसेच कागदपत्रे उपलब्ध नसणाऱ्या नागरिकांबाबतही शासन स्तरावर लवकरात लवकर निर्णय होण्यासाठी प्रस्ताव सादर करा, अशा सूचना पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिल्या.

कुरुकली येथील भूखंडधारकांबाबतची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली, कागलचे तहसीलदार अमरदीप वाकडे, विकास पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

कुरुकली येथील बेघर ७७ नागरिकांना घर बांधण्यासाठी शासनाकडून सन १९८९ मध्ये भूखंड देण्यात आला आहे. कागदपत्रे उपलब्ध असणाऱ्या जागा मालकांच्या नावे संबंधित भूखंड करुन देण्याची कार्यवाही गतीने करा. कागदपत्रे उपलब्ध नसलेल्या नागरिकांबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करा. याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांनी केली.

येथील पूरग्रस्त नागरिकांनी भूखंड मिळण्याबाबत आवाहन केले असता उर्वरित १६ पूरग्रस्तांनाही भूखंड वाटप करण्याची कार्यवाही करा, अशी सूचना पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांनी यावेळी केली.

बेघर नागरिकांचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने राज्य शासनाकडे लवकरात लवकर सकारात्मक प्रस्ताव सादर करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिली.

# योजनेत ६०७ कोटींचा नियतव्यय मंजूर

**जळगाव :** जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने २०२४-२५ या आर्थकि वर्षासाठी जिल्हा वार्षकि योजना (सर्वसाधारण) साठी ६०७ कोटी रूपयांचा नियतव्यय मंजूर केला आहे. विशेष म्हणजे मागील वर्षापेक्षा यात ९७ कोटींची वाढ झाली आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी निधी वाढीसाठी विशेष प्रयत्न केले. राज्यस्तरीय बैठकीत जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापुढे वाढीव निधीचे क्षेत्रनिहाय सादरीकरण केले. यामुळे वाढीव नियतव्यय शासनाने मंजूर केला आहे.



राज्य शासनाने जळगाव जिल्हा वार्षकि योजना (सर्वसाधारण) २०२३-२४ या आर्थकि वर्षासाठी ५१० कोटींचा नियतव्यय मंजूर केला होता. मात्र, हा निधी जिल्ह्याच्या विकासासाठी अतिशय कमी असल्याने यात वाढ करून जिल्ह्यासाठी ६०७ कोटी रूपये मंजूर करावेत, अशी आग्रही मागणी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केली होती. या मागणीला वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी तात्काळ अनुकूलता दर्शविली. जिल्ह्याच्या विकासासाठी शासनाने ६०७ कोटी रूपये मंजूर केले आहेत. याबाबतचे आदेश जिल्हा नियोजन समितीला ६ फेब्रुवारी २०२४ रोजी प्राप्त झाले आहेत.

राज्यस्तरीय बैठकीत जळगाव जिल्ह्याकडून करण्यात आलेल्या सादरीकरणानंतर जिल्हा योजनेचा नियतव्यय अंतिम करतांना कार्यान्वीय यंत्रणांनी मागणी, जिल्ह्याचे वैशिष्ट्य, गरजा तसेच शासनाची प्राथमिकता इत्यादी बाबी विचारात घेऊन जिल्हा वार्षकि योजना (सर्वसाधारण) २०२४-२५ करीता ६०७ कोटी (नागरी भागासाठी विशेष अतिरिक्त नियतव्ययासह) नियतव्यय शासनाने अंतिमत: मंजूर केला आहे. राज्यात गतीने होत असलेले नागरीकरणाच्या प्रमाणात जिल्हा वार्षकि योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतींना विशेष अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करून देण्याची आवश्यकता विचारात घेऊन २०२४-२५ या वर्षाकरिता जिल्ह्याकरीता ७९ कोटी ५३ लाखांचा विशेष अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या सूचनानुसार जिल्हा विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. यासाठी मंजूर नियतव्ययापैकी किमान २५ टक्के निधी जिल्हा विकास आराखड्यासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. नियोजन विभागाच्या १८ ऑक्टोंबर २०२३ अन्वये निर्गमीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद नावीन्यपूर्ण योजना, शाश्वत विकास ध्येय आणि मूल्यमापन सनियंत्रण व डाटा एन्ट्रीसाठी ५ टक्के निधी, महिला व बाल विकास विभागाच्या सर्वसम ावेशक योजनांसाठी ५ टक्के, सांस्कृतिक कार्य विभागाच्या गड-किल्ले, मंदीरे व महत्त्वाची संरक्षित स्मारके इत्यादींचे संवर्धन या योजनेसाठी ३ टक्के, महसूल विभागाच्या गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण या योजनेसाठी कमाल ५ टक्के निधी राखीव ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

# देणाऱ्या स्वत:च्या 'सॅटेलाईट' साठी शासन प्रयत्नशील : मंत्री अनिल पाटील

**जळगाव :** विकसित देशांमध्ये कोणत्याही नैसर्गकि आपत्तीची पूर्वसूचना देणारे तंत्रज्ञान आहे. यामुळे तेथील नागरिक, शेतकरी यांना नैसर्गकि संकटांपासून सतर्क करता येते. त्यातून आर्थकि व जीवीत हानी ही टाळता येते. यादृष्टीने तंत्रज्ञानाची कास धरत महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे स्वत:चे सॅटेलाईट असावे. यासाठी मदत व पुनर्वसन विभाग प्रयत्न करत आहे. अशी माहिती राज्याचे मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी आज येथे दिली. कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन, संशोधन आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याच्या प्रस्तावाचा शासन सकारात्मक विचार करेल. अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगाव जिल्हा प्रशासन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामार्फत 'उष्मालाट पूर्वतयारी व सौम्यीकरण व्यवस्थापन' या विषयावर आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे मंत्री अनिल पाटील यांच्या हस्ते



आज झाले. यावेळी कुलगुरू डॉ. महेश्वरी, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक आप्पासो धुळाज, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद उपस्थति होते. या कार्यशाळेत अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव डॉ.सोनिया सेठी मंत्रालयातून ऑनलाईन उपस्थिती होत्या.

मंत्री श्री. पाटील म्हणाले की, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यातील काही भाग उष्णतेच्या लाटेने होरपळत असतो. शेतकरी, शाळकरी मुले व रस्त्यावरील विक्रेते यांना उन्हाच्या लाटेचा थेट सामना करावा लागतो. कार्यशाळेचे माध्यमातून अधिकाऱ्यांनी स्वत:ची कल्पकता व सूचनांची मांडणी करावी. निर्णयापर्यत जाण्यासाठी अनुभवांचे आदान-प्रदान झाले पाहिजे. उष्मा लाट का येते, कशी येते याची कार्यशाळेत कारणांमिमासा झाली पाहिजे. जनजागृतीच्या माध्यमातून मृत्यू दर कमी करता येईल.

शेती व रोजगाराचे उष्णतेच्या लाटेपासून संरक्षण व्हावे, यासाठी जनजागृती करण्याची गरज आहे. मृत्यू दर कमी कसा होईल यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभाग सातत्याने प्रयत्न करत आहे. शेतकऱ्यांचे संरक्षण झाले पाहिजे यासाठी शासन प्रयत्न करत आहे. असे ही त्यांनी यावेळी सांगितले.

कुलगुरू श्री.माहेश्वरी म्हणाले की, हवामान बदल, जलवायू परिवर्तनाची समस्या जगात उद्भवत आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात राज्यशासनाच्या वतीने राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

श्रीमती सौनिक म्हणाल्या की, उष्णतेच्या लाटेमुळे नागरिक व प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. जिल्ह्यातील हवामानाचे बदल प्रशासनाने समजून घेतले पाहिजे. उष्णतेच्या लाटेबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती करण्याची गरज आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून आलेल्या सूचनांचा राज्यस्तरीय कृती आराखड्यात समावेश केला जाईल.

श्रीमती सेठी म्हणाल्या की, राज्यातील २२ जिल्ह्यात उष्मा लाटेचा उन्हाळ्यात प्रभाव असतो. आपले उद्दिष्ट शून्य मृत्यू हे धोरणावर काम करणे आवश्यक आहे. उन्हापासून संरक्षणाच्या दृष्टीने तयार करायच्या व्यवस्थापनासाठी यंत्रणांनी सुसज्ज असणे आवश्यक आहे. अल्पकालीन उद्दिष्ट न ठेवता आपण दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवून काम केले पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन कक्ष येत्या काही दिवसात अद्यावत करण्यात येणार आहेत. राज्य व जिल्हा पातळीवर यंत्रणांमध्ये समन्वय ठेवत कार्यक्षमता वाढविण्यासाठी काम करण्यात येईल.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले की, अतिशय महत्त्वाच्या विषयावर चिंतन होणार आहे. उत्तर महाराष्ट्र व विदर्भात उष्णतेचे प्रमाण अधिक असते. उष्णतेचे क्षमन व्हावे. उन्हा पासून नागरिकांचा बचाव कसा करता येईल. या विषयी या कार्यशाळेच्या माध्यमातून धोरण ठरणार आहे.

यावेळी उपस्थति मान्यवरांच्या हस्ते उष्णतेच्या लाटेच्या कृती आराखड्याचे अनावरण करण्यात आले. आभार आप्पासो धुळाज यांनी मानले.

उद्घाटन सत्रानंतर मुंबई प्रादेशिक हवामान केंद्रांचे उप महासंचालक सुनिल कांबळे यांचे 'उष्णतेच्या लाटे संदर्भातील – व्याख्या, परिभाष, पूर्व सुचना निकष, पुर्व सूचना प्रणाली आणि २०२४ साठीचे पुर्वानुमान ' या वषियावर व्याख्यान झाले. युनसिफचे प्रकल्प अधिकारी अनिल घोडके यांचे 'मध्य भारतामध्ये क्लामेट स्मार्ट इन्स्टट्यिूशन चा वापर करून उष्मा लाटेचे सौम्यीकरण आणि अत्यावश्यक सेवा या विषयावर ' व्याख्यान झाले. राज्य हवामान कृती कक्ष आणि पर्यावरण व वातावरीणीय बदलाचे संचालक अभिजीत घोरपडे यांचे 'राज्य हवामान कृती आराखडा आणि विभागाच्या इतर योजना 'या विषयावर व्याख्यान झाले. गांधीनगरच्या इंडियन इन्स्टट्यिूट ऑफ पब्लकि हेल्थचे प्राध्यापक डॉ.महावीर गोलेच्छा यांचे 'उष्णता लाटेच्या कृती आराखडा तयार करणे तसेच संबंधित विभागाने घ्यावयाच्या प्रमुख कृती' याविषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या डॉ.योगश्री सोनवणे यांचे 'उष्णतेच्या लाटेच्या कृतीसाठी तयारी, आव्हाने आणि पुढील मार्ग-सार्वजनिक आरोग्य विभाग'या विषयावर व्याख्यान झाले.

९ फेब्रुवारी रोजी उष्णतेची लाट आणि शेती या विषयावर कृषी विभागाचे सेवानिवृत्त प्रकल्प अधिकारी अनिल भोकरे यांचे व्याख्यान होणार आहे. नागपूरचे सेवानिवृत्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नंदकिशोर राठी यांचे 'उष्णतेच्या लाटेचा कृती आराखडा आणि त्याची अंमलबजावणी' या विषयावर व्याख्यान होणार आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक आप्पासो धुळाज यांचे 'राज्य उष्णतेच्या लाटेचा कृती आराखड्यातील आढावा आधि पुढील वाटचाल' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यशाळेला राज्यातील सर्व निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, महापालिका, नगरपालिकांचे अधिकारी, कृषी , आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, आपदा मित्र उपस्थति आहेत.

### मंडल आयोगाला चॅलेंज करावंच लागेल

# मनोज जरांगे पाटील यांनी दिला इशारा

**नाशिक :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आज (८ फ ेब्रुवारी) नाशिक दौऱ्यावर असून त्यांचे नाशिक शहरात ठिकठिकाणी मराठा समाजाच्या वतीनं जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर पत्रकारांशी बोलत असताना ''जशी तुमची लेकरं आहेत, तशी आमची पण आहेत, तुम्ही जगा आणि आम्हाला जगू द्या, मात्र आमच्या आरक्षणाला आडवे याल तर मंडळ आयोगाला चॅलेंज करावा लागेल'', असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

छगन भुजबळ यांना समजवावे : यावेळी बोलत असताना जरांगे पाटील म्हणाले की, ''मराठा समाजाच्या आरक्षणाच्या विरोधात ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ तीन वेळा आलेत, आता त्यांनी ते सोडून द्यावे, ओबीसी समाजानं छगन भुजबळ यांना समजवावं, अन्यथा आपल्याला मंडल आयोगाला चॅलेंज करावे लागेल. येत्या १० फेब्रुवारीपासून मुंबईत उपोषण करणार आहोत.'' तसंच सरकारने सांगितल्याप्रमाणे



सगे-सोयरे आदेशाची अंमलबजावणी सुरू करावी. याशिवाय मराठा समाजावरील आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घ्यावे, अशी आपली मागणी होती त्याचीही पूर्तता झाली नाही त्यामुळं हे उपोषण करण्यात येणार असल्याचं पाटील यांनी म्हटलं आहे.

**नाशिकचं पाणीच तसं आहे :** नवी मुंबईत विजयोत्सव साजरा केला, मग आता मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसण्याची वेळ का आली? अशी टीका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली होती. त्यावर मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ''राज ठाकरे यांच्या पाठीशी देखील मराठा समाजाचे तरुण मोठ्या प्रमाणात आहेत, ते असं कधीच बोलत नाहीत, नाशिकला आल्यावर ते बोलले. नाशिकच पाणीच तसं आहे, ते तेवढ्यापुरतं बोलले असतील, आता त्यांची भूमिका बदलेल.''

जरांगे पहिल्यांदाच कसमादे भागात : ८ फेब्रुवारीला सकाळी सात वाजेच्या आसपास जरांगे पाटील हे नाशिकहून वणी गडावर जातांना त्यांनी मराठा समाज बांधवांच्या भेटी घेतल्या. त्यानंतर ते दिंडोरी, कळवण, देवळा, सटाणा तालुक्यात हजारो माता, भगिनी आणि समाज बांधवांना भेटणार आहे. त्यामुळं या भागात उत्साहाचं वातावरण आहे, पहिल्यांदाच कसमादेच्या भूमीत जरांगे पाटलांचं आगमन होत असल्यानं या भागातील समाज बांधवांनी जरांगे पाटलांच्या स्वागतासाठी उपस्थित राहण्याचं आवाहन मराठा क्रांती मोर्चाच्या नाशिकच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# काँग्रेसचा 'हात' सोडण्यामागचे बाबा सिद्दीकींनी सांगितलं कारण; 'या' पक्षात करणार प्रवेश

**मुंबई :** गेल्या काही वर्षापासून काँग्रेस पक्षामध्ये सातत्यानं घुसमट होत होती. याबाबतचा निर्णय मी १५ दिवसांपूर्वीच घेतला होता. त्यावेळेस मी पक्ष नेतृत्वाला त्याची कल्पना दिली होती. त्यामुळं मी अचानक पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला, असं म्हणणं योग्य ठरणार नाही. ४८ वर्षे मी काँग्रेससोबत काम करतो आहे. १९९९, २००४ आणि २००९ सलग तीन वेळा मी आमदार म्हणून वांद्रे पश्चिम मतदार संघातून निवडून आलो. राज्यात अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री, कामगार राज्यमंत्री म्हणून मी पदभारही स्वीकारला होता, असं सिद्दीकी म्हणाले.

**अनेक पदांवर काम केलं :** माझी राजकारणातील सुरुवात विद्यार्थी दशेपासूनच झाली होती. १९९२ आणि १९९७ च्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत नगरसेवक म्हणूनसुद्धा मी काम पाहिले होते. तर २००० ते २००४ या काळात मला म्हाडाच्या मुंबई बोर्डाचा अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी पक्षामार्फत दिली गेली, असं बाबा सिद्दीकी म्हणाले.

पक्षात कोंडी करण्याचा प्रयत्न : अनेक वर्षापासून मी काँग्रेसमध्ये होतो आणि काँग्रेस पक्षानेही मला खूप काही दिलं आहे. मला हा निर्णय घेताना अतिशय वेदना होत आहेत. मात्र, सध्या काँग्रेसमध्ये काय चालले आहे हे सर्वजण पाहतच आहोत. म्हणूनच मी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतलाय. माझी पक्षात कोंडी केली जात होती. त्यामुळे हा निर्णय घेणं मला भाग पडले, असे स्पष्टीकरण बाबा सिद्दीकी यांनी दिले.

**अजित पवार गटात प्रवेश करणार :** काँग्रेसचा राजीनामा दिल्यानंतर आता आपण येत्या १० फेब्रुवारीला वांद्रे येथे होणाऱ्या 'सरकार आपल्या दारी' कार्यक्रम ात अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याचं बाबा सिद्दीकी यांनी सांगितलं. बाबा सिद्दीकी विचार मंचच्या माध्यमातून आपण शेकडो कार्यकर्ते तयार केले. हे कार्यकर्ते आपल्यासोबत अजित पवार गटात प्रवेश करतील. २०२२ मध्ये राज्यसभेसाठी माझ्या नावाची चर्चा झाली होती. राष्ट्रीय जनता दलाच्या माध्यमातून ही चर्चा सुरू होती; मात्र तसं काही



घडलं नाही. आता आपण अजित पवार यांच्यासोबत जाणार आहोत. त्यामुळे पुढच्या काही दिवसात राजकारणात मोठी उलथापालथ झालेली आपल्याला दिसेल, असंही त्यांनी सांगितलं.

ईडीची भीती नाही : ईडीच्या भीतीच्या कारवाईनं आपण जात आहात का? असं विचारलं असता बाबा सिद्दीकी म्हणाले की, ''माझ्यावर अनेक आरोप करण्यात आले.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत बनावट कंपनी बनवून शंभर कोटी रुपये घोटाळ्याचाही आरोप करण्यात आला.

**काँग्रेस नेतृत्वाला वेळोवेळी कल्पना दिली :**

**काँग्रेस पक्षामध्ये सुरू असलेल्या काही गोष्टींबाबत तसंच आपली होणारी कोंडी याबाबत आपण सातत्यानं काँग्रेस नेतृत्वाला कल्पना दिली होती. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आपल्या पितृस्थानी आहेत. त्यांनीही आपल्याला खूप मदत केली; पण तरीही हा निर्णय घेणे मला भाग पडत आहे. आतापर्यंत काँग्रेसमधील आपला प्रवास चांगलाच राहिला. परंतु, आता हा निर्णय आपण घेत आहोत, असं देखील बाबा सिद्दीकी बोलले.**

मात्र, हे सर्व झालं असलं तरी ईडीच्या भीतीमुळं मी जात नाही. तर माझ्या पक्षात होत असलेल्या कोंडीमुळे मी हा निर्णय घेतला आहे. माझा मुलगा झीशान हा अजूनही काँग्रेसमध्ये आहे. परंतु, हे राजकारण आहे. कधीही काहीही होऊ शकतं असे संकेतही सिद्दीकी यांनी दिले.

# उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्योजकांसोबत चार हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार

**पिंपरी चिंचवड :** मंत्री उदय सामंत म्हणाले, पुण्यामध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास वेगानं होत आहे. विविध प्रकारच्या उद्योगांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा येथे असून नवीन उद्योगांसाठी चांगली संधी आहे. पुण्याची क्षमता राज्यासह देशाला कळावी यासाठी या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यापुढे अशा प्रकारचा 'उद्योजकांचा मेळा' प्रत्येक जिल्ह्यात भरविण्यात येईल. यामुळे त्या जिल्ह्यात उद्योगस्नेही वातावरण तयार होईल. विविध उद्योजक आकर्षित होऊन तेथील उद्योगांमध्ये वाढ होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**'निर्यात धोरण २०२३' जाहीर:** अल्ट्रामेगा प्रकल्पासोबत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाला चांगल्या सुविधा देणं गरजेचं आहे. उद्योजक उद्योग करीत असताना त्यासाठी निर्यात ही महत्त्वाची असून हीच बाब विचारात घेऊन 'निर्यात धोरण २०२३' जाहीर करण्यात आले आहे. या धोरणाच्या माध्यमातून उद्योजकांना अधिक सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. नवीन माहिती तंत्रज्ञान धोरणामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात डेटा सेंटर निर्माण होत असून आगामी काळात जगातील डेटा सेंटरचे हब म्हणून महाराष्ट्र राज्य ओळखले जाईल, असा विश्वास सामंतांनी व्यक्त केला.

कृत्रिम बुद्धिमत्ता पार्क निर्माण करण्याबाबत विचार: आगामी काळात देशातील पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण आणण्यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता पार्क निर्माण करण्याबाबत विचार करण्यात येईल. राज्यात कृत्रिम बुद्धिमत्ता पार्क निर्माण करताना संरक्षण, आरोग्य, क्रीडा, कृषी आदी क्षेत्रांचा विचार करण्यात येईल. कृत्रिम बुद्धिमत्तेसोबत इलेक्ट्रिकल वाहन, हायड्रोजन या क्षेत्राच्या विकासाबाबतही प्रयत्न करण्यात येत आहे, असंही मंत्री सामंत म्हणाले.

**गडचिरोली उद्योगनगरी म्हणून ओळखली जाईल:** उद्योजकांमध्ये आत्मविश्वास निम ाण व्हावा, यासाठी उद्योजकांशी सतत चर्चा करण्यात येत आहे. शासनाच्यावतीनं त्यांना उद्योगपुरक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामुळे राज्यात परकीय गुंतवणूक वाढत असून उद्योगात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात १ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू असून येत्या काळात गडचिरोली उद्योगनगरी म्हणून ओळखली जाईल, असंही सामंत म्हणाले.

**यासाठी 'मैत्री' संकेतस्थळ सुरू:** उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे म्हणाले, राज्यात परकीय गुंतवणुकीसह उद्योगामध्ये वाढ झाली पाहिजे. याकरिता उद्योग विभागाच्यावतीनं काम करण्यात येत आहे. उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या परवान्यासाठी 'मैत्री' संकेतस्थळ सुरू करण्यात आले असून आवश्यक त्या सर्व परवानग्या विहित मुदतीत देण्यात येत आहेत. राज्यात निर्यात धोरणाच्या अनुषंगानं सूचना असल्यास उद्योग विभागाला कळवाव्या, असंही आवाहन त्यांनी केलं.

**उद्योग मंत्र्यांची महाटेक-२०२४ प्रदर्शनाला भेट:** उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शिवाजीनगर येथील कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित 'महाटेक २०२४' या लघु व मध्यम उद्योजकांच्या प्रदर्शनाला भेट देऊन माहिती घेतली. यावेळी लघु व मध्यम उद्योजकांच्या विकासासाठी शासन प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**'या' मान्यवरांची उपस्थिती:** कार्यक्रमाला उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, उद्योगविकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अपर उद्योग आयुक्त प्रकाश वायचळ, अपर उद्योग संचालक संजय कोरबु, उद्योग सह संचालक शैलेश रजपूत आदी उपस्थित होते.

## बहिणीला परीक्षेनंतर घरी घेऊन परतत असताना काळाचा घाला, तीन भावंडांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** वनविभागाची चाचणी परीक्षा देऊन परतणाऱ्या बहिणीचा आपल्या दोन भावांसह अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना बीड बायपासवरील बाळापूर फाटा परिसरात घडली. गुरुवारी सकाळी तिघेजण दुचाकीवरून जात असताना मागून येणाऱ्या डंपरने त्यांना जोराची धडक दिल्यानं हा अपघात झाला. या घटनेनंतर ट्रक चालक पसार झाला असून तिथे असलेल्या हॉटेल चालकाने पोलिसांना या घटनेसंदर्भात माहिती दिली आहे. तसंच घटनेची माहिती कळताच कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून घाटी रुग्णालयात कुटुंबियांचा आक्रोश पाहायला मिळाला.

**सकाळी झाला अपघात :** प्रवीण भगवान अंभोरे (वय-२८), प्रतिक्षा भगवान अंभोरे (वय-२२), प्रदीप उर्फ लखन भगवान अंभोरे (वय २०) (रा. आकोली ता. जिंतूर) असे मृतांचे नाव आहे. हे तिघं बहीण भाऊ असून ते सातारा परिसरात भाड्याच्या घरात राहत होते. गुरुवारी सकाळी बहीण प्रतिक्षा अंभोरे हीची वनविभागाच्या नोकरीसाठी एमआयडीसीच्या मैदानावर शारिरीक चाचणी होती. शारिरीक चाचणी देऊन तिघेजण झाल्टा फाट्याकडून देवळाई चौकाकडे येत असताना पाटीलवाडा हॉटेल समोर पाठीमागून हायवाने धक्का मारल्यामुळं ते तिघं हायवाखाली (डंपर) आले. त्यामुळं त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# वयानुसार त्वचेची काळजी कशी घ्याल जाणून घ्या



विशीच्या वयात त्वचा मुलायम, मऊ आणि घट्ट असते. त्वचेचा रंग सफरचंदाच्या सालीसारखा दिसतो, पण या वयातसुध्दा मॉइश्चरायझर लावणे आवश्यक असते. कारण त्वचा मॉइश्चर ठेवणाऱ्या पेशी हळूहळू निष्क्रिय होत असतात. मेकअप करण्यापूर्वी मॉइश्चरायझर लावावे.

तिशीमध्ये त्वचा कोरडी पडायला लागते. थोडीशी पिवळसर किंवा क्रिमी दिसायला लागते. डोळ्यांच्या भोवतालची आणि तोंडाभोवतालच्या त्वचेची काळजी या वयात जास्त घ्यायला हवी. फुल्याफुल्यासारख्या सुरकुत्या दिसल्या तर ते त्वचा कोरडी असल्याचे लक्षण आहे. गालावर आणि कपाळावर हा कोरडेपणा जास्त दिसतो. तुमच्या चेहऱ्यावर केवळ हसण्याच्याच रेषा दिसतात असं नाही, काळजीच्या आणि नाराजीच्या रेषासुध्दा दिसतात. त्या रेषांवर जरा लक्ष द्या.

चाळिशीमध्ये डोळ्याखालच्या आणि गळ्यावरच्या सुरकुत्यांकडे जास्त लक्ष द्यावे लागेल. तिशीमध्ये त्वचेची काळजी घेतात तशीच चाळिशीमध्येही घ्यावी लागते. त्वचेला सतत २४ तास पौष्टिक घटक कसे मिळतील याचा विचार करायला हवा.

चाळिशीच्या शेवटीशेवटी किंवा पन्नाशीला त्वचेची नीट काळजी घेतली नाही तर त्वचा खूप कोरडी आणि सैल पडते.

तोंडाभोवती आणि डोळ्याखाली व कपाळावर सुरकुत्यांचे जाळे पसरते. त्वचा निस्तेज व काळसर दिसू लागते. त्वचेखालच्या सूक्ष्म रक्तवाहिन्या सहजपणे फुटतात. त्यातून पाझरलेल्या रक्तामुळे लालसर जांभळ्या रंगाचे डाग दिसू लागतात. स्नायू सैल झाल्यामुळे हनुवटीखालची त्वचा लोंबायला लागते. ओठांचे कोपरे खाली झुकतात. मानेवर आडव्या रेषा दिसतात. गळ्याचे स्नायू लोंबायला लागतात. पण याची सुरुवातीची लक्षणे दिसताच रोज हलका मसाज आणि क्रीम लावल्याने पुढची लक्षणे दिसणार नाहीत. एक लक्षात ठेवा, फक्त झोपतानाच त्वचेची काळजी घ्यायची नसते तर २४ तास काळजी घ्यायची असते.

# फक्त पुरुषांनाच टक्कल का पडते? स्त्रियांना का पडत नाही?



जगातील अनेक लोक टक्कल पडण्याच्या समस्येला तोंड देत आहेत. टक्कल पडायला लागल्यावरती काही लोकं खूप खर्च करतात. पाण्यासारखा पैसा घालवतात परंतु त्याचा त्यांना काहीच फायदा होत नाही. एकदा का टक्कल पडायला लागला की, मग त्याचे आपण काहीही करु शकत नाही. फक्त त्यावर एकच उपाय उरतो तो म्हणजे विग किंवा नकली केस लावणे. परंतु तुम्ही कधी असा विचार केला का? केस गळू लागल्यावरती पुरुषांना टक्कल पडते परंतु किती ही केस गळले तरी महिलांना मात्र टक्कल पडत नाही. असं का घडत असावं असा तुम्ही कधी विचार केलाय का? टक्कल पडण्याच्या या प्रक्रियेला वैज्ञानिकदृष्ट्या समजून घेणे आवश्यक आहे.

**स्त्रियांचेही केस गळतात पण...**

केस गळण्या मागे अनेक कारणे आहेत. तणाव, पोषणाची कमतरता आणि हार्मोनल समस्या ही यात प्रमुख कारणे आहेत. या कारणांमुळे किंवा जास्त वय झाल्यामुळे स्त्रियांना केस गळण्याच्या समस्या उद्भवतात. एवढेच काय तर प्रेग्नेंसीनंतर अनेक महिलांना केस गळण्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. केस गळल्यामुळे महिलांच्या डोक्यावर कमी केस उरतात. तरीही, स्त्रियांना टक्कल पडते असे क्वचितच घडते. परंतु पुरुषांच्या बाबतीत असे नसते. दहापैकी ७ ते ८ मुल आपल्याला पूर्णपणे टक्कल पडलेले दिसतात.

**हार्मोनल बदलांची मुख्य कारणे**

शास्त्रानुसार, डोक्यावर किंवा शरीरावर केस वाढण्यामागे हार्मोनल कारणे आहेत आणि हेच कारण केस गळण्यामागील कारण देखील आहे. एका मीडिया रिपोर्टमध्ये, टक्कल पडण्यावर केलेल्या एका संशोधनात असे सांगण्यात आले की, सेक्स हार्मोन टेस्टोस्टेरॉन हे याचे प्रमुख कारण बनते. नॉर्वेच्या बर्गन विद्यापीठातील जीवशास्त्रज्ञ पेर जेकबसन यांच्या मते, टेस्टोस्टेरॉन हे पुरुषांमध्ये स्राव होणाऱ्या एंड्रोजन गटाचे स्टेरॉईड हार्मोन आहे. या हार्मोनमुळे पुरुषांमध्ये केस गळती होते.एक गोष्ट तुमच्या लक्षात आली असेल की, टक्कल पडण्याची समस्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे देखील जाते. म्हणजे, जर वडिलांना टक्कल पडण्याची समस्या असेल, तर मुलालाही ते होऊ शकते. म्हणजेच, ही एक अनुवांशिक समस्या देखील आहे. मानवी शरीरात काही एन्झाईम असतात जे टेस्टोस्टेरॉनला डायहाइड्रोटेस्टोस्टेरॉनमध्ये रूपांतरित करतात, जे केस कमकुवत आणि पातळ होण्याचे कारण आहे. सामान्यतः हार्मोन्समध्ये असे बदल करणारे एन्झाईम जीन्समध्ये आढळतात.

# कृषी पर्यटनाला 'अच्छे दिन'



वाढत्या नागरीकरणामुळे खेडी ओस पडत आहेत व शहरे अस्ताव्यस्त पसरत चालल्याने नागरी सुविधा अपुऱ्या पडून बकाल बनत चालल्या आहेत. शहरातील वाढत्या प्रदूषणामुळे माणसाचे स्वास्थ्य हरवत चालले आहे. त्याला प्रदूषण मुक्त हवा, निर्मळ पाणी दुर्लभ झाले आहे, ते मिळावे यासाठी तो व्याकुळ होताना दिसत आहे. त्यामुळेच कृषी पर्यटनाला सध्या 'अच्छे दिन' आले आहेत.

रोजगाराच्या संधी, उच्च शिक्षण, अद्ययावत वैद्यकीय सेवा यांची उपलब्धता, वीज व पाण्याच्या दुर्भिक्षातुन मुक्तता याच्या आकर्षणातून लोक शहराकडे धाव घेतात, या सर्वच बाबतीत खेड्यांमध्ये ठणठणपाळ असल्यामुळे खेड्यातील माणसांचे लोंढे शहराकडे लागले आहेत. खेडी स्वयंपूर्ण करण्याकडे राज्यकर्त्यांनी लक्ष न दिल्याने वाढते नागरिकीकरण ही गंभीर समस्या झाली आहे. शहराच्या नागरी सुविधांवर याचा प्रचंड ताण निर्माण झाला आहे.

नागरीकरणाबरोबर वाढती वाहनसंख्या, परिणामी वाढते जल, वायू व ध्वनी प्रदूषण यामुळे शहरात लोकांचा जीव गुदमरतो आहे. त्याला मोकळ्या हवेत मोकळा श्वास घ्यावासा वाटतो, त्याला प्रदूषणापासून दूर निसर्गाच्या सानिध्यात दिवस घालवावा असे वाटते. चुलीवरील भाकरी, पिठलं, मिरचीचा ठेचा याचा त्याला हेवा वाटतो. या सर्वच गोष्टी शहरी जीवनात स्वप्नवत झाल्यामुळे कृषी पर्यटन तेजीत आले आहे.

शहरी लोकांसाठी कोणत्या गोष्टी दुर्मिळ सदरात मोडणाऱ्या झाल्या आहेत? त्यांना काय हवे आहे ते ओळखून या गोष्टींना कृषी पर्यटनात प्राधान्याने स्थान दिले जात आहे.

शेती, शेतकरी, बैलगाडी, बैलजोडी, अवजारे, वाडा, पार, पाणवठे ही खेड्याची ओळख असलेली प्रतीके कृषी पर्यटन केंद्राच्या एकाच छताखाली आणलेली दिसतात. ग्रामीण जीवनाचे शक्य तितके प्रतिबिंब मर्यादित जागेत उमटवण्याचा प्रयत्न असतो, तिथे मिळणाऱ्या आहारच्या बाबतीत हीच काळजी घेतात. भाकरी, पिठलं, ठेचा, भरलेलं वांग यासारख्या पदार्थांची शहरी लोकांना अपूर्वाई असते. त्यावर ताव मारताना लोक खूष होऊन जातात. कृषी पर्यटनात याच्या जोडीला जलतरण तलाव, रेन डान्स यासारख्या सुविधा पुरवल्या जातात खेड्यातली रम्य जीवन अनुभवण्यासाठी काही तासांची व मुक्कामाची पॅकेजेस असतात.

आपापल्या सोयीने पर्याय निवडता येतो. येथे द्याव्या लागणाऱ्या शुल्कामध्ये चहा-नाश्ता भोजनासह खर्च समाविष्ट असतो. राहायला केलेल्या खोल्यांना खेड्यांचा लूक असतो. अशा वैशिष्ट्यपूर्ण कृषी पर्यटन व्यवसायाला सध्या बरकत आली आहे. शहरी लोक वीकेंडला मोठ्या संख्येने तिकडे खेचले जात असल्यामुळे कृषी पर्यटन केंद्रे जोरात चालली आहेत. यातील काही व्यावसायिकांनी वेबसाईट सुरू केले असून त्यावर ऑनलाईन बुकींग करून जाता येते, कृषी पर्यटन केंद्रांना मिळणारा प्रतिसाद पाहून नव्याने काही शेतकरी या व्यवसायाकडे वळण्याचा विचार करत आहेत. प्रत्येकजण त्यात काही नवे देण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. अभिनव कल्पना पुढे येत आहेत. ग्रामीण अर्थकारणाला ताकद देण्याच्या दृष्टीने कृषि पर्यटन केंद्र उपयुक्त ठरत आहेत.

# आयड्रॉप कसे वापरायचे, याबद्दल माहिती असणे आवश्यक



डोळ्यांत औषधाचे थेंब सोडण्याची वेळ प्रत्येकावर कधी ना कधी येतेच. डोळ्यांच्या अनेक समस्यांमध्ये डॉक्टर संबंधिताला आय ड्रॉप देतात. परंतु, बऱ्याच वेळा ड्रॉप डोळ्यात कसे सोडायचे, याबद्दल माहिती नसल्याने ते प्रभावी ठरत नाहीत. त्यामुळे आय ड्रॉप कसे वापरायचे, याबद्दल माहिती असणे आवश्यक आहे.

डोळ्यांच्या अनेक समस्यांच्या वेळी डॉक्टर डोळ्यांत औषधाचे थेंब (आय ड्रॉप) टाकण्याचा सल्ला देतात. डोळ्यांत संसर्ग, किरकोळ दुखापत किंवा ग्लूकोमा, ड्राय आय अशा समस्यांच्या वेळीही लोक आय ड्रॉपचा वापर करतात.

अर्थात, योग्य परिणाम साधायचा असल्यास आय ड्रॉपचा वापर करण्याची आपली पद्धत योग्य असायला हवी.

दुसरा ड्रॉप टाकायचा असेल, तर पहिला थेंब टाकल्यानंतर पाच ते दहा मिनिटे प्रतीक्षा करा आणि मग दुसरा ड्रॉप सोडा. डोळ्यांसाठी वेगवेगळ्या दोन प्रकारची औषधे लिहून दिली असतील, तर त्याचा क्रम योग्य ठेवावा. तुम्ही आय सोल्यूशन आणि आय सस्पेन्शन अशा दोहोंचा वापर करीत असाल, तर आधी सोल्यूशन डोळ्यांत सोडा आणि नंतर सस्पेन्शन.

याखेरीज तुम्ही जर आय ड्रॉप आणि आय ऑइन्टमेन्टचा वापर करीत असाल, तर आधी आय ड्रॉप डोळ्यांत सोडला पाहिजे आणि नंतर दहा मिनिटांनी ऑइन्टमेन्टचा वापर केला पाहिजे. जर तुम्हाला स्वतःला डोळ्यात ड्रॉप सोडणे अवघड जात असेल, तर कुटुंबातील

आय ड्रॉप योग्य प्रकारे डोळ्यांत घातले, तरच ते आत चांगल्या प्रकारे शोषले जातात आणि परिणामकारक ठरतात.

डोळ्यात ड्रॉप टाकण्यापूर्वी संसर्गाचा धोका टाळण्यासाठी आपले हात साबणाने किंवा सॅनिटायझरने स्वच्छ धुऊन घ्यावेत. आय ड्रॉप डोळ्यांत टाकण्याची योग्य पद्धत म्हणजे तुम्ही पाठीवर झोपा आणि डोके मागील बाजूस झुकवा. त्यानंतर बोटाने डोळ्याची खालची पापणी खालील बाजूस ओढा. त्याच भागात आय ड्रॉप सोडायचा असतो. आय ड्रॉपची बाटली डोळ्याच्या वर धरा आणि ड्रॉपर खालच्या दिशेला वळवा. ड्रॉपरचे टोक आपल्या डोळ्याला न टेकू देता जितके शक्य आहे तितके डोळ्याजवळ ठेवा. आपले मनगट कपाळावर ठेवून ड्रॉप डोळ्यात टाकणाऱ्या हाताला आधार द्या, जेणेकरून ड्रॉप टाकणारा हात थरथरणार नाही.

ड्रॉपची बाटली अशा प्रकारे दाबा जेणेकरून एकच थेंब खालच्या पापणीच्या आतील भागावर पडेल. आता डोळा हळुवारपणे बंद करा. यावेळी पापण्यांची उघडझाप, बुब्बुळांची हालचाल किंवा पापण्या घट्ट मिटणे टाळा. जेव्हा डोळा बंद असेल तेव्हा डोळ्यांच्या आतील कोपऱ्यावर हलका दाब देण्यासाठी एका बोटाचा वापर करा.

ही प्रक्रिया आय ड्रॉप तुमच्या नाकपुडीत, तोंडात किंवा घशात जाऊ देत नाही. तुम्हाला त्याच डोळ्यात पुन्हा एखाद्या सदस्याची मदत जरूर घ्यावी. डोळ्यांच्या आसपास औषधाचे थेंब पडल्यास ते पुसण्यासाठी स्वच्छ टिश्यू पेपरचा वापर करावा. आय ड्रॉपच्या बाटलीचे झाकण उघडण्यापूर्वी नेहमी हात साबणाने स्वच्छ धुवावेत. अन्यथा डोळ्यांना संसर्ग होण्याची शक्यता असते. बाटली उघडल्यानंतर बाटलीवर लिहिलेली एक्सपायरी डेटफ जरूर तपासून पाहावी. लेबलवर लिहिलेल्या सूचनांचे पालन करावे. तुम्ही कॉन्टॅक्ट लेन्सचा वापर करीत असाल, तर आय ड्रॉप डोळ्यात सोडल्यानंतर कमीत कमी पंधरा मिनिटे प्रतीक्षा करा. आय ड्रॉप सोडल्यानंतर डोळे जळजळणे किंवा टोचल्यासारखे वाटणे स्वाभाविक आहे; पण डोळ्यांना सूज आल्यास मात्र तातडीने डॉक्टरांना भेटावे.

# दातदुखीवर घरगुती उपाय

बेकिंग सोड्यामध्ये अँटीबॅक्टेरियल, अँटीफंगल आणि अँटीसेप्टीक गुणधर्म असतात. कोमट पाण्यात बेकिंग सोडा टाकून गुळण्या करा. यामुळे दातातील वेदना कमी होतील. दातदुखी ही एक तशी सामान्य समस्या आहे. बऱ्याच वेळा थंड किंवा गरम गोष्टी खाण्यामुळे दात दुखतात. यामुळे हिरड्यांमध्ये वेदना आणि सूज येते. कधीकधी दातदुखी इतकी वाढते की खाणे-पिणे कठीण होते. या दातदुखीची समस्या दूर करण्यासाठी आपण अनेकदा औषधे घेतो. पण प्रत्येक वेळा औषध घेणे योग्य नाही. दातदुखीची समस्या दूर करण्यासाठी आपण काही घरगुती उपाय केले पाहिजेत.

घसा खवखवणे, खोकला आणि दातदुखी दूर करण्यासाठी मीठाचे पाणी अत्यंत फायदेशीर आहे. यासाठी तुम्हाला फक्त एक कप कोमट पाणी घ्यावे लागेल आणि त्यात थोडे मीठ मिसळावे लागेल. त्यानंतर या पाण्याने गुळण्या करा. हे तोंडाचे संक्रमण कमी करून वेदना कमी करण्यास मदत करते. जर हे करूनही वेदना कमी झाल्या नाहीतर डॉक्टरांचा सल्ला घ्या.लवंग

दातदुखीवर लवंग हा एक जुना उपाय आहे. हे केवळ वेदना कमी करत नाही तर सूज देखील कमी करते. वेदनेपासून आराम मिळविण्यासाठी आपण अनेक प्रकारे लवंग वापरू शकता. यासाठी आपण लवंगची गरम चहाचे सेवन करु शकता. याशिवाय बाधित भागाला तुम्ही लवंग तेल लावू शकता. भारतीय पाककृतीतील हे सामान्य घटक दातदुखीवर नियंत्रण ठेवण्यास मदत करू शकतात. त्यात बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म आहेत जे बॅक्टेरिया नष्ट करू शकतात आणि वेदना कमी करणारे म्हणून कार्य करतात.



# फळबागांची लागवड करताना......

फार प्राचीन काळापासून मनुष्याच्या आहारात फळांचा समावेश असल्याचे आढळून येते . मनुष्य भटक्या स्थितीत फिरत असताना तो प्राण्याची शिकार व जंगलातील लहान मोठी फळे यांवर उदनिर्वाह करीत असे . कालांतराने तो शेती करू लागल्यावर फळझाडांची लागवड निवासस्थानाभोवती लहान प्रमाणावर होऊ लागली असावी. ईजिप्शियन लोक, खजूर, द्राक्षे, ऑलिव्ह, अंजीर, केळी, लिंबू गटातील फळे आणि डाळिंब या फळझाडांची लागवड करीत. फळझाडांपैकी मनुष्याने सर्वप्रथम खजुराच्या झाडाची इ.स.पू. ७००० वर्षे या काळात लागवड सुरू केली. डाळिंबाची लागवड इ.स.पू. ३५०० वर्षे या काळात होत असे.

आहारातील फळांचे महत्त्व : फळांत पचनास सुलभ अशा प्रकारची शर्करा असते त्यामुळे ती लहान मुले व उतार वयाच्या अथवा अशक्त प्रौढांसाठी फार उपयुक्त आहेत. सर्वसामान्य प्रकृतीच्या मनुष्यांसाठीही त्यातील जीवनसत्त्वे व खनिज



पदार्थांमुळे ती उपयुक्त आहेत. शिवाय ती सारक असून निरनिराळ्या फळांत विशिष्ट औषधी गुणधर्मही असतात. आंबा, पपई, फणस आणि खजूर या फळांत अ जीवनसत्व तर काजू, अक्रोड, बदाम, जरदाळू, केळी, सफरचंद यांत ब १ जीवनसत्त्व व बेल, लिची, पपई , अननस, डाळिंब यांत ब २ जीवनसत्त्व आणि पपई, लिंबू गटातील फळे, स्ट्रॉबेरी, बोर, आवळा व अननस या फळांत क जीवनसत्त्व पुष्कळ प्रमाणात असतात .

क्षेत्र व उत्पादन : जागतिक उत्पादनाच्या दृष्टीने सफरचंद, द्राक्षे, संत्रे, मोसंबे व लिंबू गटातील इतर फळे, केळी आणि आंबा ही फळे विशेष महत्त्वाची आहेत. त्या खालोखाल ऑलिव्ह , नासपती, पीच (सत्पाळू), अलुबुखार ही फळे असून त्यानंतर खजूर, अननस, जरदाळू, अ‍ॅव्होकॅडो व स्ट्रॉबेरी या फळांचा क्रमांक लागतो. जगात सर्वांत अधिक उत्पादन द्राक्षाचे असून त्याखालोखाल लिंबू गटातील फळांचे आहे. त्यानंतर अनुक्रमे केळी व सफरचंद यांचा क्रमांक लागतो.

हवामान : फळझाडांच्या लागवडीत जमीन व हवामान या दोन बाबींना फार महत्त्व आहे व त्यांतही हवामानाला विशेष महत्त्व आहे. तापमान , आर्द्रता, पाऊस व वारा हे हवामानाचे मुख्य घटक आहेत. प्रत्येक फळझाडाच्या वाढीसाठी विशिष्ट तापमान लागते. सफरचंदाला थंड हवामान व आंबा, केळी, फणस या फळांना उष्ण हवामान लागते. फणस व केळी यांसारख्या फळांना मुबलक प्रमाणात हवेतील आर्द्रता लागते. उलट जास्त आर्द्रतेमुळे काही फळांचा रंग बिघडतो व त्यांचा टिकाऊपणा कमी होतो. तसेच दमट हवेत कवक (बुरशीसारख्या हरितद्रव्यरहित वनस्पती ) आणि सूक्ष्मजंतू यांपासून होणाऱ्या रोगांचे प्रमाण वाढते. थंड हवामानात कीटकांचा उपद्रव कमी प्रमाणात असतो. विशिष्ट प्रदेशात कोणत्या फळझाडाची लागवड करावयाची हे ठरविताना एकूण पर्जन्यमान आणि त्याची वर्षभरातील विभागणी यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो . सपाटीच्या प्रदेशात फार पावसामुळे झाडांच्या मुळांशी पाणी साठते आणि फूल व फलधारणेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. फार कमी पावसाच्या प्रदेशात विहिरी अगर कालव्याची सोय असेल तेथेच फळझाडांची लागवड करता येते . उष्ण वारे, चक्री वादळे, वालुका वादळे आणि गारा यांपासून झाडांचे व फळांचे फार नुकसान होते. फळबागेसाठी क्षेत्राची निवड करतेवेळी या सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक असते. पूर्वीच्या अनुभवावरून कोणत्या हवामानात कोणत्या फळाची लागवड यशस्वी होते, हे सर्वसाधारपणपणे ठरविता येते. उष्ण प्रदेशीय, उपोष्ण प्रदेशीय आणि समशीतोष्ण प्रदेशीय अशा तीन प्रकारच्या हवामानांत वाढणारी फळे आणि स्थूलमानाने त्यांच्या लागवडीस अनुकूल असे भारतातील प्रदेश पुढीलप्रमाणे आहेत.

उष्ण प्रदेशीय हवामानातील फळे : आंबा, केळी, काजू, चिकू, अननस, पपई आणि फणस या फळांना उन्हाळ्यात उष्ण व दमट आणि हिवाळ्यात सौम्य हवामान लागते. उष्ण हवामानामुळे फळातील शर्करा वाढण्यास मदत होते. प. बंगाल व मध्य प्रदेशाचा दक्षिण भाग आणि महाराष्ट्र, ओरिसा, आंध्र प्रदेश, कर्नाटक , तमिळनाडू व केरळ राज्याच्या संपूर्ण भागात या फळांची विशेष प्रमाणात लागवड होते. या सर्व प्रदेशांत सर्वसाधारणमानाने कडाक्याची थंडी पडत नाही. जागेची निवड व आखणी : हवामान, जमीन व पाणीपुरवठा या गोष्टींचा एकत्र विचार करून बाजारपेठेपासून शक्य तितक्या नजीक फळबागेची जागा पसंत करावी. झाडे लावण्यासाठी बागेच्या आखणीच्या (मांडणीच्या) चार पद्धती प्रचलित आहेत : (१) चौरस, (२) षट्कोणी, (३) कर्णाकृती व (४) समपातळी. झाडांच्या वाढीची पद्धत, झाडांना पुरेसा प्रकाश मिळण्याची आवश्यकता आणि सुलभ आंतर मशागत या गोष्टींचा विचार करून झाडांच्या मांडणीची पद्धत निवडतात. चौरस पद्धतीची झाडांची मांडणी सर्वत्र प्रचलित व लोकप्रिय आहे. यात चौरसाच्या प्रत्येक कोपऱ्यावर एक झाड लावतात. षट्कोणी पद्धतीतील षट्कोणाच्या सहा कोपऱ्यांवर सहा व मधोमध एक याप्रमाणे झाडे लावतात. चौरस पद्धतीत चार कोपऱ्यांवर संथपणे वाढणाऱ्या झाडांच्या मधोमध एक थोड्या मुदतीत व जलद वाढणाऱ्या प्रकाराचे झाड लावतात व संथपणे वाढणाऱ्या झाडांची पूर्ण वाढ झाल्यावर हे मधले झाड कापून टाकतात. या प्रकारच्या मांडणीला कर्णाकृती पद्धत असे नाव आहे. टेकडीवर व जास्त उताराच्या जागेत समपातळी पद्धतीने झाडे लावतात.